# पंढरी संचार

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | वर्ष २९ | अंक - २३१

पंढरपूर | शनिवार, ११ जानेवारी २०२५ | किंमत ₹ ४ | पाने : ८

NO PAIDNEWS





माळशिरस तालुक्यातील शैक्षणिक साहित्य सादरीकरण सर्वांचे... PII





330 शेतकऱ्यांच्या नुकसानीसाठी 33 लाखापर्यंत भरपाई... PIII


# बिल्डरांना दणका

## महारेराची मोठी कारवाई: १९५० प्रोजेक्ट सस्पेंड; बँक खाती गोठवली



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन घरांचा ताबा देण्याची म्हणजेच पझेशनची तारीख उलटून गेल्यानंतरही 'महारेरा'कडे कोणतीही माहिती अपडेट न करणाऱ्या प्रकल्पांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरण म्हणजेच 'महारेरा'ने १० हजार ७७३ प्रकल्पांविरोधात कारवाई करताना त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती. त्यापैकी १९५० प्रकल्पांना स्थगिती देण्यात आली आहे. या विकासकांची बँक खाती गोठवण्यात आली आहेत. तसेच प्रकल्पाशी संबंधित व्यवहारांवरही निर्बंध घालण्यात आलेत. याशिवाय आता पुढील टप्प्यामध्ये कारणे दाखवा नोटीसला प्रतिसाद न देणाऱ्या ३४९९ प्रकल्पांवर कारवाई करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली आहे. मागील महिन्यात काम वेळेत पूर्ण न करणाऱ्या प्रकल्पांना नोटीस पाठवण्यात आल्या होत्या. उत्तर देण्यासाठी निर्धारित करुन दिलेल्या ३० दिवसांच्या कालावधीमध्ये एकूण ५३२४ प्रकल्पांनी प्रतिसाद दिला. यामधील ३५१७ प्रकल्पांनी ओसी सादर केली तर ५२४ प्रकल्पांनी मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे. तर प्रतिसाद देणाऱ्या कागदपत्रांची सध्या छाननी सुरु आहे. » पान ३ वर





"प्रत्येक गृहनिर्माण प्रकल्पाने घर खरेदीदारांना प्रकल्पाची स्थिती कळावी, यासाठी कायद्याने अपेक्षित असलेली प्रकल्पस्थिती महारेराच्या संकेतस्थळावर त्रैमासिक, वार्षिक अशा कालबद्ध पद्धतीने अद्ययावत करणे बंधनकारक आहे. या नियमाची पूर्तता न करणाऱ्या गृहनिर्माण प्रकल्पांवर कारवाईचे पाऊल उचलण्यात आले आहे."

**— मनोज सौनिक, अध्यक्ष, महारेरा**

### कोणत्या जिल्ह्यातील किती प्रकल्प रद्द?

- स्थगित करण्यात आलेल्या प्रकल्पांपैकी सर्वाधिक २४० प्रकल्प रायगडमधील आहेत. त्या खालोखाल स्थगित प्रकल्पांपैकी २०४ प्रकल्प ठाण्यातील आहेत.
- नवी मुंबई आणि उपनगरांमधील ११ प्रकल्प स्थगित करण्यात आलेत. पालघरमधील १०६ प्रकल्प स्थगित झाले आहेत. मुंबईतील ५१ प्रकल्प स्थगित करण्यात आले आहेत.

### नेमकी कशी होते कारवाई?

- 'महारेरा'कडे नोंदणी करताना प्रत्येक विकासकाला म्हणजेच बिल्डरला प्रकल्प कधी पूर्ण होणार याची तारीख सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नोंदवावी लागते. प्रकल्प दिलेल्या तारखेपर्यंत पूर्ण झाला नसेल तर मुदतवाढ मिळवण्याची प्रक्रिया विकासकाला पूर्ण करावी लागते. तसेच प्रकल्प सुरु करण्याआधी काही अडचण आल्यास अर्ज रद्द करण्यासाठीही प्रक्रिया करावी लागते.

# तिसरे विश्व मराठी संमेलन यंदा पुण्यात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागातर्फे आयोजित तिसरे विश्व मराठी संमेलन यंदा पुण्यात होणार आहे. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी या कालावधीत हे संमेलन होणार असल्याची घोषणा राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केली. या संमेलनाच्या उद्‌घाटनाप्रसंगी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्यासह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच विश्व मराठी संमेलन आहे. यापूर्वीची दोन संमेलने अनुक्रमे मुंबई आणि नवी मुंबई येथे झाली होती. 'आंतरराष्ट्रीय दर्जाचे लिखाण केलेल्या एका ज्येष्ठ साहित्यिकाचा आणि मराठी भाषेत कामाला सुरुवात करून आज लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचलेल्या एका तरुणाचा सन्मान करण्याचा उपक्रम या संमेलनापासून सुरुवात करत आहोत. याअंतर्गत यंदा ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक आणि अभिनेते रितेश देशमुख यांचा या संमेलनात गौरव केला जाणार आहे. संमेलनात तरुणांना केंद्रस्थानी ठेवले जाणार आहे', अशी माहिती सामंत यांनी दिली. पुण्यातील सर्व साहित्यिकांशी चर्चा झाली असून संमेलनातील कार्यक्रमांबाबत त्यांच्या सूचना जाणून घेतल्या आहेत. त्यानुसार बालसाहित्यापासून संतसाहित्य आणि लोककलांपर्यंत प्रत्येक बाबीचा समावेश » पान ३ वर

**संमेलन**


## » At a Glance

### मुलांना पैसे का दिले म्हणून मारहाण



**अक्कलकोट :** मुलांना पैसे का दिलास, असे म्हणत दगड, काठीने मारहाण करून फिर्यादीस मारहाणीचा प्रकार पानमंगरूळ येथे झाला. याबाबत दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदला आहे. फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी येऊन तू रोजी मुलांना पैसे का दिलाच, असे म्हणून शिवीगाळी, दमदाटी केली. रविकांत बिरगे याने मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी वैशाली करपे (रा. पानमंगरूळ, ता. अक्कलकोट), मेहुणे रविकांत शिवानंद बिरगे, श्रीकांत शिवानंद बिरगे (दोघे रा. शिवशाही शंकरनगर, सोलापूर) यांच्याविरुद्ध तक्रार दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### बांधकाम कामगारांची नोंदणी होणार मोफत



**करमाळा :** बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यासाठी एजंटगिरी सुरु झाल्याची अनेक दिवसांपासून चर्चा होती. त्यातून नोंदणीसाठी काहीजण जादा पैसे घेत होते. मात्र आता या एजंटगिरीला चाप बसणार असून करमाळ्यात स्वतंत्र कार्यालय सुरु झाले असून तेथे मोफत नोंदणी होणार आहे, असे आवाहन संबंधित विभागाने केले आहे. राज्य सरकारच्या कामगार विभागाअंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई अंतर्गत करमाळ्यात बांधकाम कामगार सुविधा केंद्र सुरु झाले आहे.

### दोन किलो सोने देऊन 10 लाखांची फसवणूक



**बार्शी :** माझी पत्नी आजारी असून माझ्याकडे जुने सोने आहे, असे सांगून दोघांनी मिळून दोन किलो बनावट सोने देऊन एकाची दहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार गुरुवार (दि. 9) रोजी सव्वा बारा वाजता बार्शीतील शुभाष नगर भागात घडला. याप्रकरणी बिट्टू (पूर्ण नाव माहीत नाही) व अन्य एक अनोळखी महिला अशा दोघांवर शहर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वैराग भागात वाढला वाघाचा मुक्काम



**बार्शी :** अनेक दिवसांपासून बार्शी तालुक्यात वाघाचे दर्शन होत आहे. वाघाने वैराग परिसरात आपला मुक्काम वाढलवला असून, तीन दिवस जनावरांवर हल्ला केला आहे. पहिल्या दिवशी मुंगशी (आर) परिसरात दोन जनावरां वर हल्ला केला त्यानंतर सासुरे व शेळगाव हद्दीत हल्ल्यात दोन वासरांवर मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी वैराग येथील लाडोळे तळ्याजवळ विनायक खेंदाड यांच्या बैलावर जीवघेणा हल्ला करून एक पाय खाऊन टाकला. त्यामुळे बैल जखमी झाला आहे. वनविभाग माणसावर हल्ला करण्याची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

# हरी नामाच्या गजराने पंढरी दुमदुमली; पुत्रदा एकादशी निमित्त लाखो भाविक दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पुत्रदा एकादशी निमित्त विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरात लाखो भाविक दाखल झाले. सकाळपासून भाविकांनी दिंडी काढून टाळ मृदंगाच्या गजरात हरिनामाचा गजर केला. यामुळे पंढरी नगरी दुमदुमून गेली आहे. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज पन्नास हजार हून अधिक भाविक येतात. एकादशी निमित्त पंढरीत एक लाखाहून अधिक भाविक दाखल झाले होते. गड्डा यात्रेनिमित्त उजनी धरणातून सोलापूरला पाणी सोडले असल्यामुळे चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहत आहे. यामुळे आलेल्या भाविकांनी चंद्रभागा नदीमध्ये पवित्र स्नान केले. यानंतर विठ्ठलाच्या दर्शनासाठी पद दर्शन व मुखदर्शन रांगेत रांगा लावल्या.यामुळे विठ्ठलाची पद दर्शन रांग रिद्धी सिद्धी गणपती पर्यंत गेली होती. सकाळी थंडी असल्यामुळे भाविकांना थंडीचा सामना करावा लागला. भाविकांनी दिंडी काढून नगर प्रदक्षिणा केली. यामुळे हरिनामाच्या गजराने पंढरी नगरी दुमदुमून गेली होती. आलेल्या भाविकांनी विठ्ठलाचा प्रसाद व खेळणी तसेच विविध वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत गर्दी केली होती. त्यामुळे बाजारात चांगली उलाढाल झाली आहे. पुत्रदा एकादशी व सलग शनिवार रविवार अशा दोन सुट्ट्या आल्या असल्यामुळे पुत्रदा एकादशी दिवशी भाविकांची संख्या वाढली असल्याचे दिसून आले.





## एसटी बसच्या सुरक्षेसाठी निधी मंजूर करा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** दोन दिवसांपूर्वी मोहोळ बसस्थानकामध्ये एसटी बसला आग लागून झालेल्या घटनेनंतर आमदार राजू खरे यांनी या घटनेची दखल घेत मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. मोहोळ नगरपरिषदेला अग्नी सुरक्षा अभियान योजनेअंतर्गत मंजूर झालेली रक्कम तातडीने अदा करण्यात यावी, अशा आशयाचे पत्र दिले. त्या पत्रानुसार तातडीने कारवाई करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले असल्याची माहिती आमदार राजू खरे यांनी दिली.

# आरटीई अंतर्गत पंढरपूर तालुक्यातील ४८ शाळेत मुलांना प्रवेश मिळणार!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** शिक्षण हक्क अधिनियम आर टी ई दुर्बल वंचित घटकाकरिता 25% ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया शाळा नोंदणीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्या शैक्षणिक वर्षासाठी पंढरपूर तालुक्यातील ४८ शाळा मधून विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे . जिल्ह्यात स्वयं अर्थ सहित ४८९ शाळा आहेत. यात १८९ शाळा अल्पसंख्यांक दर्जाच्या आहेत. यातील ३०० शाळा आरटीई प्रदेशासाठी पात्र ठरविण्यात आल्या होत्या. पात्र असणाऱ्या शाळा पैकी २८९ शाळांनी आरटीई प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी केली आहे. शाळा नोंदणीसाठी १८ ते ३१ डिसेंबर या कालावधीत ऑनलाइन प्रक्रिया पार पडली. नोंदणीनंतर शाळा पडताळणी करण्यात येणार आहे. या अनुषंगाने सर्व संबंधित शाळांनी पडताळणी करता बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शाळा, अनाधिकृत शाळा तसेच स्थलांतरित झालेल्या शाळा बाबत प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी योग्य ती खबरदारी घेतली आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून पंढरपूर तालुक्यातील ४८ शाळा मधून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.



# कर्ज थकबाकी प्रकरणी दीपक साळुंखे यांच्या जमिनीचा होणार लिलाव




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पुण्यातील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांनी माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांच्या खैराव तालुका माढा येथील जमिनीचा दुसऱ्यांदा लिलाव पुकारला आहे. 13 फेब्रुवारी रोजी हा लिलाव होणार आहे. साळुंखे यांनी पुण्यातील शिवाजीराव भोसले सहकारी बँकेकडून कर्ज घेतले होते. या कर्जासाठी साळुंखे यांनी खैराव येथील जमीन गहाणखता द्वारे तारण ठेवले होते. या कर्जाची रक्कम व्याजासह 27 कोटी 50 लाख रुपये झाली आहे. या थकीत कर्ज वसुलीसाठी वसुली अधिकारी बी.बी. दरवडे यांनी यापूर्वी जाहीर लिलाव पुकारला होता. ही जमीन आहे तशी व जेथे आहेत तेथे या तत्त्वावर हा लीलाव पुकारण्यात आला होता. पहिल्यांदा या लिलावास अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे दुसऱ्यांदा लिलावाची नोटीस काढण्यात आली आहे. या लिलावात सहभागी होणाऱ्या इच्छुकांनी 10 फेब्रुवारीपर्यंत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यानंतर 13 फेब्रुवारी रोजी लिलाव होणार आहे . माजी आमदार दीपक आबा साळुंखे यांच्याकडे सोलापूर जिल्हा बँकेची कोट्यावधी रुपयाची थकबाकी आहे. यामुळे आता जिल्हा बँक कोणती भूमिका घेणार याकडे लक्ष लागले आहे.

## तू मला आवडतेस म्हणत विवाहितेचा विनयभंग


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सांगोला :** शेतात चारा आणण्यासाठी गेलेल्या विवाहितेचा पाठलाग करून तू मला आवडतेस असे म्हणून तिला मिठी मारून मनास लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करून एका तरुणाने तिचा विनयभंग केला. याबाबत पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी किरण आबा लवटे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. गुरांना चारा घालण्यासाठी गोठ्यामध्ये गेली असता त्या ठिकाणी आरोपी उभा होता. आरोपीने तिचा हात धरून त्याच्याजवळ ओढून तू मला आवडतेस असे म्हणून तिला मिठी मारली व तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## दागिने अर्पण...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीस सुमित मोरगे या दानशुर भाविकांकडून 6 लक्ष किंमतीने सोने-चांदी दागिने अर्पण केले. यामध्ये गोफासह लिंग, बेलपान, मंगळसुत्र, बाजूबंद इत्यादी 81 ग्रॅम वजनाचे सोने वस्तू तसेच 75 ग्रॅम वजनाचे चांदीची करंडे / वेढणे जोड वस्तू दान केली आहे. संबंधित भाविक हे नांदेड येथील रहिवाशी असून, श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे निस्सिम भक्त आहेत.

## मकर संक्रांत निमित्त सुगड व चुडा करण्याला वेग

# लाखो रुपयाची उलाढाल; छोटे-मोठे व्यवसायिक मालामाल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मकर संक्रांत सणानिमित्त महिला कुंभारवाड्यातून सुगड खरेदी करतात व सौभाग्याचे अलंकार असलेला लाखेचा चुडा हातात घालून घेतात. यामुळे सुगड व चुडा याला चांगली मागणी असल्याने पंढरपुरात सुगड व चुडा तयार करण्याला वेग आला असल्याचे दिसून येत आहे. यातून लाखो रुपयाची उलाढाल होणार आहे .

गेल्या महिन्यापासून कुंभारवाडा येथे सुगड तयार करण्यास सुरुवात झाली आहे. सुगड तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या दरात वाढ झाली असल्याने सुगड दरात वीस ते तीस टक्के वाढ झाली आहे. कुंभार कुटुंबातील महिला वर्ग नवी पेठ, भादुले चौक, इंदिरा गांधी भाजी मार्केट, स्टेशन रोड आदी ठिकाणी सुगड विक्री करण्यासाठी बसतात. आलेल्या महिला भाविक सुगड खरेदी करतात. यानंतर विठ्ठल रुक्मिणी मंदिरात जाऊन रुक्मिणी मातेस वानवसा करतात व सौभाग्याचे अलंकार असलेला लाखेचा चुडा हातात घालून घेतात. चुडयास चांगली मागणी असल्यामुळे गेल्या दोन महिन्यापासून संतपेठ परिसरात अनेक छोट्या-मोठ्या कारखान्यामधून चुडा तयार करण्यास सुरुवात झाली आहे. यंदा चुड्यास महागाईची झळ बसणार आहे. यामुळे महिला वर्गांना आर्थिक फटका सहन करावा लागणार आहे. मकर संक्रांत निमित्त महिला वर्ग हळदीकुंकू ठेवून एकमेकींना विविध वस्तू भेट देतात. यामुळे विविध वस्तूंना खूप मागणी असते. यामुळे पंढरपुरात वस्तूंची दुकाने थाटण्यात आली आहेत. शंभर ते पाचशे रुपये डझन पर्यंत विविध वस्तू विक्री होत आहेत.





पंढरी संचार

## प्रवासी महिलेचे दागिने लांबवले

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**सोलापूर :** एसटी मधील गर्दीचा फायदा घेत सुमारे 1 लाख 10 हजार रुपयांचे दागिने चोरून नेल्याची घटना 6 जानेवारी रोजी सकाळी साडेअकरा ते दुपारी साडेबारा वाजण्याच्या दरम्यान सोलापूर एसटी स्टँड येथे घडली. याबाबत कीर्ती प्रवीण बिराजदार (वय 24, रा. शेळगी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. कीर्ती या सोलापूर येथून धुळखेड येथे एसटीने जाणार होत्या. त्यावेळी एसटीतील गर्दीचा फायदा घेत बॅगेतील 35 ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र व 3 ग्रॅम वजनाचे कानातील टॉप्स चोरून नेले आहेत.

### मकर संक्रांत निमित्त

# रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी महिलांची सोय करण्याची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** मकर संक्रांत निमित्त पंढरपुरात रुक्मिणी मातेस वाणवसा करण्यासाठी हजारो महिला येतात. यामुळे रुक्मिणीच्या दर्शनाची सोय मंदिर समितीने करावी अशी मागणी महिलातून होत आहे. गेल्या अनेक वर्षापासून भाविक महिला पंढरपुरात येऊन रुक्मिणी मातेस मानवाचा करतात. यामुळे प्रत्येक वर्षी पंढरपुरात हजारो महिला दाखल झालेल्या असतात यामुळे मंदिर परिसरात महिलांची गर्दी असते. त्यामुळे विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने मकर संक्रांत निमित्त महिलांना वानवासा करता यावा म्हणून खास सुविधा करावी अशी मागणी होत आहे. पंढरपूर शहर व परगावहून हजारो महिला मकर संक्रांत निमित्त पहाटेपासून विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरात गर्दी करतात. यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवावा व मंदिर समितीने महिलांना खास दर्शनाची सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी महिला वर्गातून होत आहे. मकर संक्रांत निमित्त पंढरपुरात हजारो महिला दाखल होत असल्याने रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होऊन महिलांना त्रास होऊ नये याकडे वाहतूक पोलिसांनी लक्ष द्यावे.

**सोलापूर :** सोलापुरात पेट्रोल भरून जाणाऱ्या दुचाकीने घेतला अचानक पेट, आगीचं कारण अद्यापही अस्पष्ट आहे सोलापुरातील महापौर बंगल्याजवळील सायंकाळी सहा वाजता घडली घटना, चालत्या दुचाकीला खालून आग लागल्यामुळे दुचाकीने घेतला अचानक पेट घेतल्यामुळे मोठी आग लागली. दुचाकी चालकाच्या सावधगिरीने मोठा अनर्थ टाळला सोलापूर अग्निशामक दलाच्या जवानांकडून दुचाकी ला लागलेली आग आली. कासिम शेख असे दुचाकी मालकाचे नाव आहे. चालत्या दुचाकीला आग लागल्यामुळे बघणाऱ्यांची गर्दी झाली होती.

### उल्हास नवभारत साक्षरता मेळावा अंतर्गत कार्यक्रमात

## माळशिरस तालुक्यातील शैक्षणिक साहित्य सादरीकरण सर्वांचे लक्षवेधी ठरले



■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** नवसाक्षरांना विविध माध्यमातून साक्षर करण्यासाठी विविध विषयावर शैक्षणिक साहित्यांची मांडणी करण्यासाठी उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमा अंतर्गत जिल्हास्तरीय शैक्षणिक साहित्यांची मांडणी यामध्ये माळशिरस तालुक्यातील शिक्षकांनी आहार व आरोग्य या विषयावरील स्टॉलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.जिल्हा परिषदे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची उल्लास नवभारत साक्षरता वरील स्टॉलला भेट देऊन प्रशंसा केली.

सोलापूर येथे ज.रा. चंडक विद्यालयात नुकताच उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रम जिल्हास्तरीय मेळावा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला.नव साक्षरांना विविध माध्यमातून साक्षर करण्यासाठी विविध विषयावर शैक्षणिक साहित्याची मांडणी करण्यात आली होती.यावेळी माळशिरस तालुक्यातून विभागीय स्तरावर दाखल केलेल्या आहार व आरोग्य या विषयावर शिवलिंग बाबुराव गुमे (केंद्र-खुडूस) श्रीम. सोनी प्रभाकर कानडे (केंद्र कन्या माळशिरस),सिध्देश्वर बसवराज घोगरे (केंद्र- इस्लामपूर) शिक्षकांनी आकर्षक नाविन्यपूर्ण स्टॉलची उभारणी केली होती.या शैक्षणिक स्टॉलला सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,शिक्षणाधिकारी (योजना) सौ.सुलभा वटारे मॅडम यांनी भेट दिली.नवसाक्षरांसाठी राज्य शासनाने व केंद्र शासनाने आजपर्यंत सुरू केलेल्या विविध योजनांच्या प्रतिकृती या स्टॉलमध्ये मांडण्यात आल्या होत्या.आरोग्याचा शंकू,पोषण आहाराची बाराखडी तसेच सर्व साहित्यांचे केलेले सादरीकरण पाहून साहित्याचे कौतुक केले. यावेळी जिल्ह्यातील विविध नवसाक्षर,स्वयंसेवक यांनीही स्टॉलला भेटी देऊन विषयाचे महत्त्व जाणून घेतले. उल्हास नवभारत साक्षरता मेळावा यामध्ये साहित्याची मांडणी केलेल्या शिक्षकांचे माळशिरस तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी प्रदिपकुमार करडे,शिक्षण विस्तार अधिकारी सौ.सुषमा महामुनी मॅडम,बी.आर.सी. विषयतज्ञ विनोद चंदनशिवे यांनी नवसाक्षर व स्वयंसेवक यांचे कौतुक केले.

## संतोष देशमुख यांच्या हत्येचा नोंदविला निषेध



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा उळे कासेगाव ता. दक्षिण सोलापूर येथील लोकनियुक्त युवा सरपंच यशपाल श्रीकांत वाडकर (सरपंच परिषद, मुंबई महाराष्ट्र) यांनी निषेध व्यक्त केला. यावेळी वाडकर यांनी मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा व्हावी, संतोष देशमुख यांच्या कन्येला शासकीय नोकरी मिळावी, शासनाने सरपंच संरक्षण कायद्याची निर्मिती करावी आदी मागण्या मांडल्या. यावेळी कासेगाव, गंगेवाडी, उळे, उळेवाडी, वडजी, उळेवाडी, आदी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.

## » Selected

### निर्यातक्षम केळी उत्पादनासाठी पोषक वातावरण



**सोलापूर :** कुंभारगाव ॲग्रो प्रोड्युसर कंपनीच्या वतीने कमलाई कृषी प्रदर्शन आणि निर्यातक्षम केळी व डाळिंब परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी श्री. जाचक बोलत होते. डाळिंब मार्गदर्शक राहुल रसाळ आणि पाणी फाउंडेशनचे मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या वेळी व्यासपीठावर कृषी प्रदर्शनाचे प्रमुख सागर वाकचौरे, तहसीलदार शिल्पा ठोकडे, उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील, पोलिस निरीक्षक विनोद घुगे, पाणी फाउंडेशनचे रवींद्र खोमणे, विभागीय समन्वयक संतोष शिंनगारे, आदी उपस्थित होते.

### एनटीपीसीसाठी लागणार चार लाख टन बायोमास



**सोलापूर :** एनटीपीसी अर्थात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळाच्या सोलापूर येथील ऊर्जा निर्मिती प्रकल्पासाठी कोळशामध्ये मिसळण्यासाठी बांबू बायोमास खरेदी करणार आहे. त्यासाठी दरवर्षी चार लाख टन बांबूचे बायोमास लागणार आहे. शाश्वत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपन्यांसोबत 50 वर्षांसाठी प्रारंभिक करार केले जातील. पर्यावरण संवर्धनासाठी बायोमासवर आधारित ऊर्जा प्रकल्प ही काळाची गरज असल्याचे एनटीपीसीचे अध्यक्ष गुरदीप सिंग यांनी सांगितले.

### राज्यपाल राधाकृष्णन यांचे सोलापुरात आगमन



**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा २० वा दीक्षांत समारंभ आज शुक्रवारी सोलापुरात संपन्न होणार आहे. या समारंभाचे अध्यक्ष स्थान महामहिम राज्यपाल तथा कुलपती, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सी. पी. राधाकृष्णन हे भूषविणार आहेत. या समारंभासाठी राज्यपाल राधाकृष्णन यांचे सोलापूर येथे आगमन झाले असून, होटगी रोडवरील विमानतळावर त्यांचे मनपा आयुक्त शितल तेली उगले यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस आयुक्त एम राजकुमार आदी अधिकारी उपस्थित होते.

### रेल्वे रुग्णालयातर्फे क्षय रोग जनजागृती रॅली



**सोलापूर :** सोलापूर विभागातील डॉ. कोटणीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटल व महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने क्षयरोग निर्मूलन जनजागृतीच्या100 दिवसांच्या मोहिमेचा एक भाग म्हणून 8 जानेवारी 2024 रोजी क्षयरोग (टीबी) जनजागृती रॅली काढण्यात आली. डॉ. कोटणीस मेमोरियल रेल्वे हॉस्पिटलच्या प्रांगणातून निघालेली ही रॅली गणेश कॉलनीतून मार्गस्थ होऊन सोलापूर रेल्वे स्थानकावर सांगता झाली. यामध्ये हातात जनजागृतीचे फलक घेऊन, सहभागींनी क्षयरोगाबद्दल जागरूकता निर्माण केली. तसेच रोगाची लक्षणे, उपचार याबद्दलची माहिती दिली.

## विटाचा टेम्पो पलटी होऊन एकाचा मृत्यू




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शीहून घारीकडे विटा घेऊन निघालेला टेम्पो पुरी हद्दीमध्ये पलटी झाल्याने, एक जणाचा मृत्यू झाला असून, दोघेजण गंभीर जखमी आहेत. जखमींवर बार्शी येथील रुग्णालयामध्ये उपचार चालू असल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेचा अधिक तपास पांगरी पोलिस करत आहेत. विटाचा टेम्पो पलटी होऊन ही दुर्दैवी घटना घडली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## प्रशासकीय इमारत परिसरात स्वच्छता मोहीम राबवणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात जानेवारी 2025 रोजी राज्यातील सर्व अधिकारी यांना शंभर दिवस उद्दिष्ट प्रति बाबत सात कलमी कार्यक्रम देण्यात आलेला आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय इमारतीमधील सर्व शासकीय विभाग प्रमुख अधिकारी कर्मचारी यांनी एकत्रित येऊन या इमारत परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला असून या अनुषंगाने 11 जानेवारी 2025 रोजी सकाळी आठ ते दहा या कालावधीत विशेष स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. या बैठकीस उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, ओंकार पडोळे आदी उपस्थित होते.

## निवड...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माळशिरस :** माळशिरस तालुक्यातील वेळापूर गावाचे सुपुत्र रामजी हरिश्चंद्र कश्यप यांची दिल्ली येथे होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाल्याची बद्दल कश्यप यांचा सत्कार खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी घेतलेले छायाचित्रे.

## सीईओ कुलदीप जंगम यांनी घेतली सांगोला पंचायत समितीमधील खाते प्रमुखांची आढावा बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सांगोला :** सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषदेचे ॲडिशनल सीईओ,डेप्युटी सीईओ व खाते प्रमुख यांच्या उपस्थितीत सांगोला पंचायत समिती मधील खातेप्रमुख व ग्रामपंचायत अधिकारी यांची नुकतीच आढावा बैठक घेतली.

सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) कुलदीप जंगम यांनी दौऱ्याच्या दिवशी सकाळी ८ वाजताच सांगोला तालुक्यातील वाढेगाव येथे "डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन" योजनेच्या विहीर लाभार्थींची भेट घेऊन पाहणी केली. तसेच गौडवाडी येथील बायोगॅस व सोलर टॅपचीही पाहणी केली.यावेळी त्यांचे सोबत गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी,सहाय्यक गटविकास अधिकारी वसंत फुले,कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे,कृषी अधिकारी दिपाली शेंडे इ.उपस्थित होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर,प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) ईशादीन शेळकंदे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) अमोल जाधव,कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे,नरेगा गटविकास अधिकारी अरुण वाघमोडे,लेखा अधिकारी रुपाली रोकडे,जिल्हा कृषी अधिकारी सागर बारवकर उपस्थित होते. यावेळी सर्व कामकाजाचा आढावा घेण्यात आला. यामध्ये दलित वस्ती कामकाज,घरकुल स्वच्छ भारत मिशन,१५ वित्त आयोग,सेवानिवृत्त प्रकरणे,पेन्शन प्रकरणे व आयुक्त तपासणी शक,जलजीवन मिशन याबाबत सविस्तर आढावा घेऊन संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.या कार्यक्रमाची प्रस्तावना ही गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांनी केली.तर,सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन विस्तार अधिकारी (आरोग्य) मिलिंद सावंत यांनी केले.

## जिल्ह्यात तब्बल २७ हजार ८२५ अर्ज दाखल!



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सरकारने नुकतेच सुरू केलेल्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेसाठी जिल्ह्यात आठ हजार ५९२ तर कुसुम योजनेंतर्गत १९ हजार २३३ अशा २७ हजार ८२५ शेतकऱ्यांनी महावितरणकडे अर्ज केले आहेत. मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेतील मंजूर चार हजार ३० अर्जांचे सर्वेक्षण सुरू असून, कुसुम योजनेतून तीन हजार ६१ सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. लवकरच उर्वरित अर्जांची छाननी करुन त्याचा सर्वे करण्यात येणार आहे. त्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

## राज्यपालांशी आमदार देशमुख यांनी केली चर्चा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन हे आज शुक्रवारी सोलापूर दौऱ्यावर आले असून सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली. तसेच त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी राज्यपालांसोबत राज्याच्या विकासासाठी विविध विषयांवर सकारात्मक चर्चा केली. तसेच सोलापूर जिल्ह्यातील विकास कामांची माहिती दिली.




आयुर्वेद शास्त्राच्या मताप्रमाणे गीर गाईचे दूध हे ह्युमिनिटीप्रधान तसेच लहान बालकांसाठी अत्यंत उपयुक्त असे आहे.

### घोंगडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला ; सांगोला तालुक्यातून हळहळ व्यक्त

## पतीच्या तिसऱ्या दिवसाच्या विधी दिवशी पत्नीने संपवली जीवन यात्रा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** पतीच्या मृत्यूचा विराह सहन न झाल्याने, पत्नीने पत्रा शेडमध्ये लोखंडी अँगल ला गळफास घेऊन आत्महत्या केली ही दुर्दैवी घटना गुरुवारी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास वाढेगाव तालुका सांगोला येथे घडली. अनिता निखिल घोंगडे वय 23 असे गळफास घेऊन मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. याबाबत सांगोला ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांनी पोलिसात खबर दिली आहे.

वाढेगाव येथील निखिल घोंगडे याचा 5 डिसेंबर रोजी अनिता हिच्या समवेत विवाह झाला होता. विवाह नंतर निखिल ने आपल्या लग्नपित्यार्थ नातेवाईकांना 8 डिसेंबर रोजी रिसेप्शन पार्टी दिली होती. त्यानंतर घरात मंगल कार्य झाल्यामुळे घोंगडे कुटुंबीयात आनंदाचे वातावरण होते. दरम्यान 7 जानेवारी 2025 रोजी निखिल घोंगडे यांचा अल्पशा आजाराने दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे पत्नी अनिता निशब्द झाली होती. पतीच्या तिसऱ्या दिवसाचा विधी काल गुरुवारी सकाळी साडेसात वाजता होता तत्पूर्वी पत्नी अनिता यांनी पतीचा विराह सहन न झाल्याने राहत्या घराच्या पाठीमागील पत्रा शेडमध्ये ओढणीने लोखंडी अँगल ला गळफास घेतला. पहाटेच्या वेळी नातेवाईकांना अनिता घरात दिसून न आल्यामुळे शोधाशोध करीत असताना, अनिता यांनी गळफास घेतल्याचे दिसून आले. अनिता यांना खाली उतरवून तातडीने उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय येथे दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे सांगितले. अवघ्या एक महिन्यातच आनंदित असणाऱ्या घोंगडे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळल्यामुळे अखख गाव हळहळ व्यक्त करीत आहे.



पंढरी संचार

**माढा :** पुणे, सोलापूर जिल्ह्यांच्या सीमेवर साकारलेल्या उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात विदेशी पक्ष्यांचे आगमन झालेय. यामुळे उजनीच सौंदर्य फुलून असून हे विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी परिसरात पर्यटक आणि पक्षी प्रेमी एकच गर्दी करताहेत. उजनी धरण परिसरात विदेशी पाहुण्यांचे आगमन झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## आ.राजू खरेंच्या पहिल्याच प्रयत्नाचा बळीराजाला मिळाला न्याय

# 330 शेतकऱ्यांच्या नुकसानीसाठी 33 लाखापर्यंत भरपाई मिळाली



■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क


**मोहोळ :** जानेवारी २०२३ मध्ये उजनी डावा कालवा फुटल्याने मोहोळ तालुक्यातील पाटकुल परिसरातील शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची पैसे त्वरित द्यावेत अशी आग्रहाची मागणी मोहोळचे आ. राजू खरे यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बैठकीत केली होती.त्यावेळी येत्या आठ दिवसात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पैसे मिळतील अशी ग्वाही जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली होती.त्यामुळे राजू खरे यांच्या पाठपुराव्याने 330 शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई चा प्रश्न मार्गी लागला आहे. जवळपास 32 लाख 77हजार 240 रुपये सोलापूरचे अधीक्षक अभियंता याचे खात्यात जमा झाले असल्याचे आ. राजू खरे यांनी सांगितले आहे. उजनी धरणाच्या डाव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी सोडल्यानंतर दि 29 जानेवारी 2023 मध्ये पहाटे सहा वाजता पाटकुल तालुका मोहोळ विटे आणि फुलचिंचोली ता पंढरपूर येथील साखळी क्रमांक ११२/६५० या ठिकाणी उजनी डावा कालवा अचानक फुटला .कालवा फुटल्याने शेतकऱ्यांचे कोट्यावधीची नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीवरून गेल्या ,अनेकांच्या विहिरीवर बोरवेल गाळाने भरल्या ,ठिबक सिंचन, इलेक्ट्रिक मोटारी वाहून गेल्या तर एका शेतकऱ्याचे घर पडले . अर्ध्या तासाच्या कालावधीत शेतकऱ्यांचे होत्याचे नव्हते झाले. हि घटना घडल्यानंतर तात्कालिक आमदार, खासदार विविध वरिष्ठ शासकीय अधिकारी, कारखान्याचे अध्यक्ष यांनी संबंधित ठिकाणी भेटी देवून पहाणी केली. फोटोसेशन झाले. मात्र पुन्हा या नुकसानीची कुणी चौकशी केली ना पाठपुरावा केला. साधे विचारपूस करायला फिरकले सुध्दा नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचा हा प्रश्न दोन वर्ष शासकीय फायलीत गुंडाळून गेला होता.मात्र आ.राजू खरें यांनी आपल्या आमदारकीच्या पहिल्याच महिन्यात यावर पोटतिडकीने आवाज उठविला. यामुळेच प्रश्न सोडविण्याचा पहिला मान बळीराजाला मिळाला आहे. यामुळेच शेतकऱ्यांचा खरा कैवारी असल्याचे दाखवून दिले.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी येत्या आठ दिवसात संबंधित नुकसान भरपाई देण्यासाठी अधिकाऱ्यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुसार 8जानेवारी रोजी या विभागातील प्रमुख अधिकारी आणि आ. राजू खरे यांच्यासमवेत बैठक घेतली. या बैठकीतच निधी जमा करण्याचे निर्देश दिले होते. त्याचे तंतोतंत पालन करीत बैठक संपन्यापूर्वीच सदरचा निधी खात्यात जमा झाला आहे. ही बाब म्हणजे आपल्या पाठपुराव्यास मिळालेले पहिलेच मोठं यश असल्याने जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील याचे विशेष आभार व्यक्त केले आहे. . मागील दोन वर्षांपासून आपल्याला नुकसान मिळवून देण्यासाठी कोणी पुढे आले नाही. मात्र अगदी पहिल्याच महिन्यात आपले नूतन आणि कार्यतत्पर आमदार असलेले आ. राजू खरे यांनी पहिल्याच प्रयत्नात आपल्याला न्याय मिळवून दिला. याबाबत शेतकऱ्यांतूनही आ.खरे यांचे आभार मानले जात असून माजी लोकप्रतिनिधीच्या निष्क्रिय कारभारवर नाराजी व्यक्त केली जात आहे.

मागील दोन दिवसापूर्वी मुंबई येथे झालेल्या बैठकीत अतिरिक्त मुख्य सचिव दिपक कपूर, कार्यकारी संचालक रजपूत, सचिव संजय बेलसरे, प्रकल्प संचालक राजेंद्र मोहिते, आदिसह जलसंपदा विभागाचे सर्व वरिष्ठ अधिकारी आणि संभाव्य सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे आ. राहूल कुल, आ. अभिजित पाटील,आदी उपस्थित होते.

> **आ.राजू खरे यांच्या हस्ते होणार वाटप**
>
> वरील शेतकऱ्यांची नुकसान भरपाई मिळावी यासाठी आ. खरे यांनी पहिल्याच प्रयत्नात यश मिळविले. यामुळेच या शेतकऱ्यांना मिळणारी नुकसान भरपाईचे चेकचे वाटपही आ. राजू खरे यांचेच हस्ते करण्यात यावेत आशा सूचनाही जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अधिकारी यांना दिलेल्या आहेत.

## फेसबुकवरील धमकीमुळे तरुणाची आत्महत्या




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** बाहेरच्या राज्यातील महिलेने एका तरुणास ऑनलाइन व्हिडीओ कॉल करून त्याला ब्लॅकमेल करण्याचा प्रकार घडला. त्या मानसिक धक्क्यातून त्या तरुणाने आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली आहे. या घटनेची हकिकत अशी, मंगळवेढा परिसरातील एका तरुणाला फेसबुकवर ऑनलाइन नंबरवरून त्याला व्हिडीओ कॉल करण्याचा सल्ला दिला. या महिलेने बाथरूममध्ये जाऊन व्हिडीओ कॉल करावयास सांगितले. मुलाने त्या महिलेचे ऐकून व्हिडीओ कॉल केला. दरम्यान, हे कृत्य महिलेने रेकॉर्डिंग करून त्या तरुणास पैशाची मागणी केली. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

» पान १ वरुन

## बिल्डरांना दणका

यात पुण्यातील सर्वाधिक ४८७ प्रकल्पांचा समावेश असून, त्यांची बँक खातीही गोठविण्यात आली आहेत. महारेराकडे गृहनिर्माण प्रकल्पाच्या नोंदणीच्या वेळी प्रकल्प पूर्ततेची दिलेली तारीख उलटून गेल्यानंतरही माहिती अद्ययावत न करणाऱ्या १० हजार ७७३ व्यापगत प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या होत्या. या प्रकल्पांना अपेक्षित माहिती अद्ययावत करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी देण्यात आला. या नोटिशींना ५ हजार ३२४ प्रकल्पांनी योग्य प्रतिसाद दिला. यापैकी ३ हजार ५१७ प्रकल्पांनी भोगवटा प्रमाणपत्र सादर केले आहे. याचवेळी ५२४ प्रकल्पांनी मुदतवाढीसाठी अर्ज केले आहेत. तसेच, १ हजार २८३ प्रकल्पांच्या प्रतिसादांची छाननी सुरू आहे, अशी माहिती महारेराने दिली आहे. नोटिशीला प्रतिसाद न देणाऱ्या राज्यातील १ हजार ९५० प्रकल्पांवर स्थगितीची कारवाई करण्यात आली आहे. त्यांचे बँक खाते गोठवण्यात आले आहे. याचबरोबर या प्रकल्पांशी संबंधित खरेदी-विक्री व्यवहार करण्यावरही निर्बंध लादण्यात आले आहेत. याबाबतच्या सूचना सहजिल्हा निबंधकांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रतिसाद न देणाऱ्या आणखी ३ हजार ४९९ प्रकल्पांवरील कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे, असेही महारेराने नमूद केले आहे.

## तिसरे विश्व मराठी संमेलन...

कार्यक्रमांमध्ये केला जाणार आहे. उद्घाटनाच्या दिवशी बालगंधर्व रंगमंदिरापासून फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत शोभायात्रा काढली जाणार असून नव्या-जुन्या कवींचे काव्यसंमेलन, अभिजात दर्जासंबंधीचे चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद आदींचा समावेश संमेलनात असेल. याची सविस्तर कार्यक्रमपत्रिकाही लवकरच जाहीर केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. चौकट परदेशातील मराठी लेखक आणि साहित्यप्रेमींना बोलावणार' गतवर्षीच्या विश्व मराठी संमेलनात परदेशातील मराठी व्यक्तींना संमेलनात बोलावण्यासाठी वारेमाप खर्च करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर यंदाच्या संमेलनात परदेशस्थ मराठी व्यक्तींच्या सहभागावर सामंत म्हणाले, 'परदेशात राहत असले तरी हे व्यक्ती आपल्या महाराष्ट्राचेच आहेत. त्यांना संमेलनात सहभागी होता यावे, यासाठी गतवेळी प्रवासाचा खर्च देण्यात आला होता. यंदाही जगभरातील मराठी भाषिकांनी यात सहभागी व्हावे, असा आमचा प्रयत्न असेल.'

## 'अँटी लँड ग्रॅबिंग' कायदा करण्यासाठी अध्यादेश काढावा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** देवस्थानच्या शेतभूमी बऱ्याच प्रमाणात 'लँड ग्रॅबिंग'द्वारे अवैधरित्या हडपल्या जात असल्याने महाराष्ट्र शासनाने 'अँटी लँड ग्रॅबिंग' कायदा आणण्यासाठी अध्यादेश काढावा, या मागणीचे निवेदन 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'च्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले. मुख्यमंत्र्यांच्या नावे असलेले हे निवेदन तहसीलदार संतोष कणसे यांनी स्वीकारले. भूमी हडपणाऱ्यां विरोधी विशेष पथकाची नेमणूक करावी, अशीही मागणी त्यात करण्यात आली आहे.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**माढा :** माढा मतदार संघातील प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट आ.अभिजीत पाटील व आ. राजू खरे यांनी घेतली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार प्रसंगी आ. राजू खरे व आ. अभिजीत पाटील.

## Selected

## यावली परिसर ठरतो आहे मृत्यूचा सापळा

**सोलापूर :** सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ यावली येथे उड्डाण पुलाचे काम सुरू आहे. हे काम संथगतीने सुरू आहे. महामार्गावर मार्गदर्शक असणारे सर्विस रोड, पुढे गाव आहे, गतीरोधक आहेत असे फलक नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना अंदाज नआल्याने अपघातांच्या संख्येत वाढ होत आहे. संबंधीत ठेकेदाराने अगोदर एका बाजूच्या रस्त्याचे काम पूर्ण करून त्या रस्त्यावरून वाहनाची रहदारी सुरू करण्यात यावी नंतर उर्वरीत रस्त्याचे काम पूर्ण करावे. दोन्ही बाजूच्या सर्विस रोड वरून वाहनांची रहदारी ठेवून आणखी किती जणांचे बळी घेणार? असा संतप्त सवाल नागरिकांतून होत आहे.


**महाराष्ट्र शासन -जलसंपदा विभाग**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे- ०११**
Budgetary Notice No. ०३ व ०४ / २०२४-२५
Portal - https://wrd.maharashtra.gov.in

कार्यकारी अभियंता उजनी जलविद्युत विभाग इंदापूर जिल्हा-पुणे यांचेकडून विद्युत कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. त्याबाबतचा सविस्तर तपशील Portal - https://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर कामासंबंधित तांत्रिक वर्णन, प्रपत्रे, अटी व शर्ती इत्यादी माहिती दिनांक ११/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून ते दिनांक १८/०१/२०२५ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत वरील संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

सही/-
कार्यकारी अभियंता
उजनी जलविद्युत विभाग
इंदापूर जिल्हा पुणे
ई-मेल - ujjanihydroindapur@yahoo.com

**जिमाका/सो/जाहि/२५४/२०२४-२५**


## विवेक वर्धिनी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे चित्रकला स्पर्धेतील यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पु.ना.गाडगीळ अँड सन्स यांच्यातर्फे तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.
या चित्रकला स्पर्धेत श्रावणी देवकर हिने पाचवी ते सातवी गटात द्वितीय क्रमांक मिळवून सिल्वर मेडल व प्रमाणपत्र प्राप्त केले आहे तसेच शौर्या भोसले हिने आठवी दहावी गटात तृतीय क्रमांक मिळवून सिल्वर मेडल व प्रमाणपत्र प्राप्त केले आहे तसेच गायत्री कुंभार हिने उत्तेजनार्थ क्रमांक मिळवून वस्तू पारितोषिक व प्रमाणपत्र प्राप्त केले आहे या विद्यार्थ्यांना प्रशालेचे कलाशिक्षक मल्लिकार्जुन गुरव यांचे मार्गदर्शन लाभले विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मदन क्षीरसागर, उपाध्यक्ष शिवाजी वाघ, सचिव वैभव टोमके, खजिनदार सलीम वडगावकर, तसेच प्रशालेचे प्राचार्य उत्तरेश्वर मुंढे,उपमुख्याध्यापक सुनील पाटील व सर्व शिक्षक शिक्षकेतर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



**पंढरपूर :** पु.ना.गाडगीळ अँड सन्स यांच्यातर्फे तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पु.ना.गाडगीळ अँड सन्स यांच्यातर्फे तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शौर्या भोसले हिने आठवी-दहावी गटात तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले. या यशाबद्दल प्राचार्य उत्तरेश्वर मुंढे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## सरपंचांच्या सुरक्षेसाठी कायद्याची गरज




**माढा :** सरपंच संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणाचा निषेध म्हणून आज राज्यातील सरपंचांनी ग्रामपंचायत बंद ठेवल्या. माढा मतदारसंघातील देखील सर्व ग्रामपंचायत याच बंद ठेवण्यात आल्या. माढा तालुक्यातील भोसरे या ग्रामपंचायतीसमोर सर्व सरपंचांनी एकत्रित येऊन निदर्शने केली. यावेळी सरपंचांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा. अशी मागणी सरपंच परिषदेच्या माध्यमातून करण्यात आली.






## जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनात वसंतराव काळे आयटीआय कॉलेजची निवड



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** वसंतराव काळे औद्योगिक संस्था धोंडेवाडी (ता. पंढरपूर) यांची जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनामध्ये निवड झाली आहे. दि. २६ डिसेंबर रोजी सोलापूर शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये जिल्हास्तरी तंत्र प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. सोलापूर येथील महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक संस्थेमध्ये जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये जिल्ह्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक संस्थांनी भाग घेतला होता. जिल्हास्तरीयं तंत्रप्रदर्शनात नेम लेल्या समितीने वसंतराव काळे औद्योगिक संस्थेमधील इंजिनिअरिंग विभागातून सोलर व्हीलचेअर व नॉन इंजिनिअरिंग विभागातून वायफ ाय रोबोट वथ ए.आय या प्रोजेक्टची निवड करण्यात आली आहे. संस्थेचे अध्यक्ष कल्याण काळे, उपाध्यक्ष बाळासाहेब काळे गुरुजी, आयटीआयचे प्राचार्य संतोष गुळवे यांनी निदेशक व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले.


**जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१ दिनांक १८/१०/२०२३**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे -११**
**( महाराष्ट्र शासन अंगीकृत )**

**कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग भीमानगर**
**तालुका माढा जिल्हा सोलापूर**
**ईमेल-eeudmd@yahoo.co.in**
**दूरध्वनी क्र. ०२१८३-२३६५१२, फॅक्स ०२१८३-२३६५५१**

**ई-निविदा सूचना क्र.२ सन २०२४-२५**

महाराष्ट्र राजयाच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https:.//mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भिमानगर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये कांही बदल होत असल्यास https:.//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये |
|---|---|---|---|
| १ | उजनी धरणाच्या Ogee माथ्यावरील झीज झालेल्या संधानकाची ईपॉक्सी मॉर्टरच्या साहाय्याने दुरुस्ती व मजबुतीकरण करणे. | सोलापूर | १६.८५ लक्ष |
| २ | उजनी धरण प्रथम द्रोण पातळी मधील Piers चे Construction Joints गळती (Sweating) थांबविण्यासाठी उ६ र्व बाजूने ईपॉक्सी मॉर्टरच्या साहाय्याने उपाय योजना करणे. | सोलापूर | ४४.१२ लक्ष |
| ३ | उजनी धरणाच्या डाव्या अनुत्सर्जित दगडी भिंतीचे (NOF) सिमेंट ग्राउटिंगच्या व ईपॉक्सी मॉर्टरच्या सहाय्याने मजबुतीकरण करणे. | सोलापूर | ३२.११ लक्ष |
| ४ | उजनी धरण उजव्या व डाव्या बाजुकडील पोहोच रस्त्याचे दुरुस्ती व डांबरीकरण करणे. | सोलापूर | ४१.७२ लक्ष |
| ५ | उजनी धरण मुख्य निरिक्षण गॅलरी, Toe गॅलरी व Cross गॅलरी (सा.क्र.११०० ते १७२२ मी.) मधील रिलीफ होल साफ करणे. | सोलापूर | १६.९१ लक्ष |

ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १३/१/२०२५ ते दिनांक २०/१/२०२५
ई-निविदा उघडण्याचा दिनांक - २२/१/२०२५
जा.क्र.उधव्यवि/लेशा/७१/सन२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
उजनी धरण व्यवस्थापन विभाग, भीमानगर
दिनांक : ७/१/२०२५

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**उजनी धरण व्यवस्थापन विभाग**
**भीमानगर**

संपादकीय विशेष

# वाहन उद्योगात स्मार्ट खेळ्या

जपानी कार निर्माते नावीन्यपूर्णतेने, विश्वासार्हतेने आणि कार्यक्षमतेने जागतिक ऑटोमोटिव्ह मार्केटवर वर्चस्व गाजवतात. होंडा आणि निस्सानसारख्या आघाडीच्या ब्रँड्सनी जगभरात मजबूत उपस्थिती प्रस्थापित केली आहे. या कार उत्पादक कंपन्या उच्च दर्जाच्या, इंधन-कार्यक्षम आणि टिकाऊ वाहनांच्या निर्मितीसाठी प्रसिद्ध आहेत. निस्सान इलेक्ट्रिक वाहनांमध्ये आघाडीवर आहे, भारतीय कार बाजारात होंडाच्या साहाय्याने इलेक्ट्रिक वाहने विक्रीला आणून प्रस्थापित उत्पादकांना स्पर्धा देण्याची कंपनीची जोरात तयारी चालू आहे. या दोन कंपन्यांच्या विलीनीकरण करारानंतर स्थापन होणारी कंपनी ही टोयोटा आणि फोक्सवॅगन या दोन अग्रस्थानी असणाऱ्या जागतिक वाहननिर्मिती उद्योगांनंतर, तिसऱ्या क्रमांकाची वाहननिर्मिती कंपनी बनणार आहे. दोन्ही कंपन्यांनी जून 2025 पर्यंत हा करार पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. करारानुसार, ऑगस्ट 2026 मध्ये दोन्ही कंपन्यांच्या सूचीकरणासाठी एक सामायिक होल्डिंग कंपनी स्थापन करण्याचे उद्दिष्ट आहे.

बाजारातील वाढती स्पर्धा हे विविध कार कंपन्यांचे विविध मॉडेल्स बाजारात आणण्यामागील मुख्य कारण आहे. उत्पादनाची निवड ही पूर्णपणे आपले प्राधान्य आणि बजेटवर अवलंबून असते. त्यामुळे खरेदीदारांपैकी विविध वर्गांना संभाव्य ग्राहक बनवण्यासाठी आणि आपल्या कंपनीची विक्री वाढवण्यासाठी कंपन्यांना विविध मॉडेल्स बाजारात आणावी लागत आहेत. त्याचबरोबर विविध वैशिष्ट्ये असलेले वाहननिर्मिती उद्योग ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संयुक्तपणे उत्पादनाचा निर्णय घेत आहे. हेच उद्दिष्ट समोर ठेऊन होंडा आणि निस्सान या नामवंत कार उत्पादकांनी संयुक्त उत्पादनाचा निर्णय घेतला आहे. ग्राहकांना स्टायलिश लूक, विश्वासार्ह इंजिने आणि तुलनेने परवडणाऱ्या किंमतीत गाड्या देणे, हे आजकाल या क्षेत्रात यशाचे सूत्र बनले आहे. त्याच धर्तीवर भविष्यकाळात होंडा आणि निस्सान या कार उत्पादक कंपन्यांना संयुक्तिकिकरणाद्वारे ग्राहकांच्या पसंतीला उतरतील, आधुनिक युगात शोभतील, समोर असलेल्या नामवंत उत्पादकांच्या आव्हानात्मक स्पर्धेला सामोरे जातील, कुठल्याही प्रकारच्या बाजारपेठेमध्ये निर्धोक चालतील अशी किफायतशीर वाहनांची उत्पादने, ग्राहकांसमोर जरूर ठेवावी लागतील.

होंडा ही एक लोकप्रिय कार उत्पादक कंपनी भविष्यकाळात निस्सानबरोबर पर्यावरणपूरक मोबिलिटी सोल्यूशन्सच्या वाढत्या मागणीला सामोरे जाण्यासाठी हायब्रिड आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीवर भर देऊ शकते. जागतिक स्तरावर इलेक्ट्रिक वाहनांच्या मागणीत वाढ होत असल्याने हे विलीनीकरण भारतीय कार बाजारात प्रगत ईव्ही आणि हायब्रिड मॉडेल्स येण्याला कारणीभूत ठरु शकते. भारतीय कार मार्केटमध्ये प्रत्येक गरजेसाठी एक कार आहे. म्हणजेच ग्राहकांच्या अपेक्षेनुसार गाड्यांच्या उत्पादनावर उत्पादक कंपन्यांनी भर दिला आहे. भारतासारख्या प्रगतशील देशात ही बाजारपेठ संधी आणि आव्हानांनी भरली असून अनेक कार ब्रँड हे बाजाराच्या विक्रीतील आपल्या सर्वात मोठ्या वाट्यासाठी स्पर्धा करतात. सुमारे 3.51 लाख कार्सच्या विक्रीसह या उद्योगात अलिकडेच 5.5 टक्के वाढ नोंदवण्यात आली. यावरून कार उत्पादनासाठी भारतीय बाजाराचे महत्व लक्षात येईल. उत्पादनांच्या स्पेअर पार्टसची त्वरीत उपलब्धता, संपूर्ण देशात पोहोचलेले सेवाजाळे ही वैशिष्ट्ये उत्पादकांच्या विक्रीमध्ये मोलाची भर घालतात. त्यासाठी मारुती ही भारतातील प्रवासी कारसाठी विक्रीनंतरची सर्वोत्तम सेवा देणारी कंपनी म्हणून ओळखली जाते. भारताच्या एकूण कार विक्रीमध्ये मारुती सुझुकीचा वाटा 40 टक्क्यांहून अधिक आहे. भारतातील सर्वाधिक काळ चालणारा आणि सर्वात यशस्वी परदेशी कार ब्रँड ही भारतातील दुसऱ्या क्रमांकाची कार निर्माता कंपनी असलेल्या ह्युंडाईची ओळख आहे.

अशा उत्पादकांसमोर स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नव्याने आपली उत्पादने बाजारात उतरवणाऱ्या कंपन्यांना आपला जम बसवण्यासाठी त्या योग्यतेची उत्पादने आणि प्रभावी सेवा देणे अपरिहार्य ठरते. अशा नामवंत स्पर्धक कंपन्या बाजारात असताना येत्या काळात होंडा, निस्सान या कंपन्यांना हुशारीने काम करावे लागेल आणि त्यासाठी आपली विश्वासार्हता सिध्द करावी लागेल. विश्वासार्हते बरोबरच उत्कृष्ट मायलेज आणि स्वस्त देखभाल खर्च या गुणांमुळे भारतीय बाजारपेठेत विक्रीचे ठराविक उद्दिष्ट्य समोर ठेऊन आपले विशेष स्थान निर्माण करावे लागेल. आज याच दोन मुद्यांवरून बहुतेक कार निर्मात्यांची स्पर्धा चाललेली आढळून येते. होंडा आणि निस्सानच्या विलीनीकरणाच्या ताज्या घोषणेने बाजारात संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत.

या घोषणेनंतर निस्सानच्या शेअर्समध्ये 24 टक्क्यांनी वाढ झाली. इलेक्ट्रिक वाहने आणि स्वायत्त तंत्रज्ञानासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये वेगाने बदलणाऱ्या उद्योगातील आव्हानांना सामोरे जाण्याचे कंपन्यांचे लक्ष्य आहे. होंडा आणि निस्सानच्या संभाव्य विलीनीकरणामुळे भारतीय कार उत्पादकांमध्ये स्पर्धा वाढू शकते आणि त्याचा मोठ्या प्रमाणात परिणाम होऊ शकतो. दोन्ही कंपन्यांचा भारतीय बाजारपेठेत आधीच महत्त्वाचा वाटा आहे आणि त्यांची मॉडेल्स सर्व विभागांमध्ये लोकप्रिय आहेत. होंडा आणि निस्सान संयुक्त तंत्रज्ञान आणि कौशल्याद्वारे उपभोक्त्यांना अधिक स्पर्धात्मक वाहने चांगल्या किमतीत उपलब्ध करुन देतील. यामुळे मारुती सुझुकी, टाटा मोटर्स आणि महिंद्रा अँड महिंद्रा यांसारख्या देशांतर्गत कंपन्यांवर त्यांच्या उत्पादनांमध्ये नवनवीन सुधारणा करण्याचा दबाव वाढू शकतो. या दोन कंपन्यांच्या संयुक्तिकरणामुळे भारतीय कार निर्मात्यांना ग्रीन टेक्नॉलॉजीमध्ये अधिक गुंतवणूक करण्याचे आव्हान दिले जाऊ शकते. तसेच या विलीनीकरणामुळे भारतातील स्थानिकीकरण आणि पुरवठादार सहकार्याचे मार्गही खुले होऊ शकतात. तथापि, भारतीय कार निर्मात्यांना बाजारपेठेतील वर्चस्व राखण्यासाठी परिस्थितीशी त्वरीत जुळवून घ्यावे लागेल. चिनी कंपन्यांमधील खडतर स्पर्धा आणि जीवाश्म इंधनापासून दूर जाणे यामुळे ऑटोमोबाईल उद्योग सध्या मोठ्या बदलांमधून जात आहे. अशा परिस्थितीमध्ये या दोन मोठ्या कंपन्यांचे एकत्र येणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. होंडा आणि निस्सान या दोन्ही उत्पादकांनी भारतात काही प्रमाणात यशाची चव चाखली आहे. पण हे यश पुढे नेण्यासाठी त्यांना येत्या काळात निश्चितपणे मोठ्या स्पर्धेला तोंड द्यावे लागणार आहे.

# कंपन्या तुपाशी, कर्मचारी उपाशी

**कंपन्यांचा तोटा झाला, तरी फटका कर्मचाऱ्यांना बसतो. कर्मचारी कपात आणि पगारातही कपात केली जाते. कंपन्यांना फायदा झाला, तरी त्याचा फारसा फायदा कर्मचाऱ्यांना दिला जात नाही. गेल्या दोन वर्षांचा अनुभव लक्षात घेतला, तर कंपन्या तुपाशी आणि कर्मचारी उपाशी अशी स्थिती आहे. असे का घडत आहे, ही परिस्थिती कशी बदलता येऊ शकते, याबद्दल केलेली चर्चा.**

अर्थकारण

कैलास ठोळे

अर्थतज्ज्ञ



खासगी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत कॉर्पोरेट बोर्डरूम आणि प्रमुख आर्थिक मंत्रालयांमध्ये बरीच चर्चा सुरू आहे. 'फिक्की' आणि 'क्यूएस कार्पोरेट लिमिटेड'ने सरकारसाठी तयार केलेल्या अहवालात खासगी कंपन्यांचा नफा आणि कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबत धक्कादायक तथ्य समोर आले आहे. 2019 ते 2023 या कालावधीत अभियांत्रिकी, उत्पादन, प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा कंपन्यांसाठी चक्रवाढ वार्षिक वेतनवाढ 0.8 टक्के होती. खासगी कर्मचाऱ्यांसाठी परिस्थिती आणखी वाईट झाली आहे. कारण त्यांचे मूळ वेतन किरकोळ प्रमाणातच वाढले आहे किंवा महागाईच्या दृष्टीने नकारात्मक आहे. 2019 ते 2023 या काळामध्ये किरकोळ महागाई दर 4.8, 6.2, 5.5, 6.7 आणि 5.4 टक्क्यांनी वाढला. या अहवालामुळे भारतीय व्यवसायविश्वाने अंतर्मुख होऊन मोठे बदल करणे आवश्यक आहे. 'फिक्की' आणि 'क्वेस' सर्वेक्षण अहवालात 2019 ते 2023 या काळामध्ये वेतनासाठी चक्रवाढ वार्षिक वाढ दर सर्वात कमी 0.8 टक्के आहे. 'एफएमसीजी' क्षेत्रात तो सर्वाधिक 5.4 टक्के होता. 2019-23 या काळात बँकिंग, वित्तीय सेवा, विमा क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या पगारात 2.8 टक्क्यांनी वाढ झाली. याशिवाय रिटेल क्षेत्रामध्ये 3.7 टक्के; आयटीमध्ये चार टक्के आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रात पगार 4.2 टक्क्यांनी वाढले. पाच वर्षांच्या महागाई डेटाच्या दृष्टीने हे चित्र नकारात्मक आहे.

2023 मध्ये 'एफएमसीजी' क्षेत्रासाठी सरासरी पगार 19,023 रुपये इतका म्हणजे सर्वात कमी, तर आयटी क्षेत्रासाठी सर्वाधिक 49,076 रुपये होता. सरकारचे आर्थिक सल्लागार नागेश्वरन यांच्या मते नफ्याच्या रूपात भांडवलाकडे जाणारा उत्पन्नाचा वाटा आणि पगाराच्या रूपात कामगारांना मिळणारा उत्पन्नाचा वाटा यादरम्यान चांगला समतोल असायला हवा. कामगारांना पगार न देणे किंवा पुरेशा प्रमाणात कामावर न घेणे, हे खरे तर कॉर्पोरेट क्षेत्रासाठी आत्मघाती किंवा हानिकारक आहे. भारतीय कॉर्पोरेट क्षेत्राचा नफा गेल्या चार वर्षांमध्ये चारपट वाढला आहे. दुसरीकडे, महागाई वाढत असताना कामगारांच्या पगारात पुरेशी वाढ न केल्यामुळे भारतात आर्थिक विषमता वाढू शकते. एका अहवालानुसार देशातील अब्जाधीशांची संख्या झपाट्याने वाढली आहे. त्याच वेळी देशातील मध्यमवर्ग आकसत चालला आहे. त्याची वस्तू खरेदी करण्याची क्षमता कमी झाली आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे मध्यमवर्गीयांच्या पगारातील वाढीचा वेग. 'आयसीआयसीआय प्रूडेन्शियल' जीवन विमा योजनेने सरकारला काही आकडे दिले आहेत. त्यानुसार, या 15 वर्षांमध्ये खासगी कंपन्यांचा नफा सर्वकालीन उच्चांकावर असताना कर्मचाऱ्यांच्या पगारात मात्र त्या प्रमाणात वाढ झालेली नाही. श्रीमंत अधिक श्रीमंत होत असताना, मध्यमवर्ग कमी होत चालला आहे. याचे एक मोठे कारण आता समोर आले आहे. खासगी क्षेत्रात काम करणाऱ्या कोट्यवधी लोकांच्या वेदना या अहवालाने पुन्हा एकदा अधोरेखित केल्या आहेत.

खासगी क्षेत्रात काम करणारे कर्मचारी दुधारी तलवारीवर जगत आहेत. एकीकडे छाटणीची टांगती तलवार आहे, तर दुसरीकडे उत्तम काम करुनही माफक पगारवाढ देऊन कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याच्या दबावाला तोंड द्यावे लागत आहे. ना कामाचे तास निश्चित आहेत, ना खासगी नोकऱ्यांमध्ये पुरेशा सुट्ट्या. कुटुंब चालवण्यासाठी ही कॉर्पोरेट संस्कृती सहन करावी लागते आहे. दररोज स्वतःला इतरांपेक्षा चांगले सिद्ध करावे लागते. टार्गेट साध्य करण्याचा दबाव वैयक्तिक जीवनावरही वर्चस्व गाजवत आहे. या अहवालानुसार कंपन्यांचा नफा रॉकेटच्या वेगाने वाढत आहे; मात्र कर्मचाऱ्यांचे पगार मालगाडीच्या गतीप्रमाणे वाढत आहेत. देशातील सर्वात मोठ्या करदात्यांच्या घटत्या उत्पन्नामुळे सरकार चिंतेत आहे. या घसरणीमुळे धोरणकर्त्यांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. जीडीपी घसरण्याचे मुख्य कारण म्हणजे कॉर्पोरेट क्षेत्राचे उत्पन्न दहा टक्क्यांच्या खाली राहणे. लोकांच्या उत्पन्नावर आणि खरेदीवर त्याचा थेट परिणाम होतो. कमी उत्पन्नामुळे, कमी खरेदी होईल म्हणजेच वापरात घट होईल. कंपन्यांची तिजोरी भरणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कामगारांना अगदीच किरकोळ पगारवाढ दिली आहे. शेअर बाजार उसळला तर कंपनीच्या मालकांचा फायदा होतो, कामगारांचा होत नाही. त्यांचे वेतन कमी असेल, तर मागणी कमीच राहणार. त्यात महागाई डोक्यावर बसते. मग विकास दर घटणे स्वाभाविक आहे. मागणी घटण्याचे मुख्य कारण म्हणजे जनतेची क्रयशक्ती कमी झाली आहे. महागाईच्या तुलनेत सामान्यांचे वेतन किंवा उत्पन्न वाढलेले नाही हे अनेक अर्थतज्ज्ञ गेले काही महिने सांगत आहेत.


देशातील कंपन्या, मग त्या शेअर बाजारात सूचिबद्ध असोत अथवा नसोत; भरपूर नफा कमवत आहेत. कोरोनाकाळानंतर देशात आर्थिक विषमता वाढली असल्याचे तज्ज्ञ वारंवार सांगत आहेत; पण केंद्र सरकार ती बाब स्वीकारणे टाळत आहे. कंपन्यांना नफा मिळतो, तेव्हा त्याचा मोठा हिस्सा भाग धारकांना 'लाभांशा'च्या (डिव्हिडंड) रूपात दिला जातो. कंपनीचे सर्वात जास्त समभाग (शेअर) प्रवर्तकांच्या किंवा मालकांच्या हाती असतात. साहजिकच त्यांना कोट्यवधी रुपये मिळतात. कंपनीच्या नफ्याचा काही भाग कर्मचाऱ्यांना वेतनवाढीच्या रूपात का दिला जात नाही, या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या कमी असली तरी त्यांना भरपूर वेतन, महागाई भत्त्यात वाढ दिली जाते. सरकार खासगी क्षेत्राला तसे करण्यास सांगू शकत नाही. खासगी क्षेत्र सरकारच्या या असहाय्यतेचा फायदा घेते. त्यातच कामगार संघटना आणि कामगारांच्या हक्कांवर वेळोवेळी केलेल्या सुधारणांनी बरीच बंधने आणली आहेत. कोरोनाकाळानंतर तर नोकरी टिकवण्यासाठी कामगारांनीही ती निमूटपणे स्वीकारली. गेल्या काही वर्षांमध्ये वैयक्तिक कर्ज घेणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. नोकरीतील उत्पन्नात गरजा भागत नसल्याने नोकरदारांवर कर्ज काढण्याची वेळ आली आहे. एकीकडे कंपन्या मोठा नफा कमावून गलेलठ्ठ होत चालल्या आहेत, तर दुसरीकडे तुलनेत तुटपुंजी पगारवाढ करत आहेत. आता देशाच्या विकासावरही या कमी पगाराचा परिणाम होत आहे.

अलीकडेच देशातील आर्थिक विकासाची चिंताजनक आकडेवारी समोर आली आहे. खासगी कंपन्यांचा नफा वाढत असताना पगारवाढीचा आलेख सपाट आहे. पगारवाढ मंदावल्याचा परिणाम मागणीवर झाला आहे. खासगी कंपन्यांचा नफा चारशे टक्क्यांनी वाढला असताना पगारवाढ चार टक्केही नाही. खासगी कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांची अवस्था बिकट होण्याचे आणखी एक कारण म्हणजे त्यांचे पगार वाढण्याऐवजी घसरत चालले आहेत. या कर्मचाऱ्यांच्या क्रयशक्तीत मोठ्या प्रमाणात घट होण्याची चिन्हे आहेत. खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या कमी पगारामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेतील मंदीच्या संदर्भात सरकारने आता दखल घेतली आहे. सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी उद्योगांना या विषयात लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे. खासगी कर्मचाऱ्यांच्या पगारात सुधारणा न झाल्यास त्यांची क्रयशक्ती कमी होऊन बाजाराला मोठा फटका बसेल. उद्योगातील उत्पादनांना बाजारात मागणी राहणार नाही. कॉर्पोरेटसाठी हे आत्मघाती पाऊल असेल.


'नुवामा'च्या अहवालानुसार, शीर्ष कंपन्यांच्या संथ कमाईमुळे कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीवर परिणाम होईल. कंपन्या पुढे जाऊन पगारावरील खर्च कमी करत राहू शकतात. त्यामुळे शहरी खर्चावरही परिणाम होणार आहे. त्याचा प्रभाव विशेषतः प्रीमियम उत्पादनांच्या विक्रीवर दिसून येतो. वर्षभरात देशातील आयटी सेवा कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे 75 हजारांनी कमी झाली आहे. 2025 मध्ये कर्मचाऱ्यांच्या एकूण पगारात साधारण 9.5 टक्क्यांची सरासरी वाढ होण्याचा अंदाज एका सर्वेक्षणातून समोर आला आहे. 2024 मध्ये ही आकडेवारी 9.3 टक्के इतकीच होती. थोडक्यात, पगारवाढीचा आकडा फारसा वाढणार नसल्यामुळे येत्या काळातही कर्मचाऱ्यांचा हिरमोड होण्याची शक्यता आहे. कारण, पगाराचा आकडा मोठा असणाऱ्या वर्गावर या आकडेवारीचा फारसा परिणाम होणार नसला, तरी तुलनेने कमी पगार असणाऱ्यांची पगारवाढही टक्केवारी आणि मूळ वेतनानुसार कमी होणार असल्यामुळे ही आर्थिक सुबत्ता जवळपास मिळूनही न मिळाल्यासारखीच असेल. 2024 मध्ये सुरुवातीचे काही दिवस तांत्रिक क्षेत्रासाठी अतिशय आव्हानात्मक होते. टेक्नॉलॉजी काऊन्सिलिंग आणि सर्विस क्षेत्रामध्ये होणारी पगारवाढ 8.1 टक्क्यांच्या घरात असेल.

# भारतमातेचे थोर सुपुत्र : लाल बहादूर शास्त्री

श्याम ठाणेदार



भारतमातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज ५९ वा स्मृतिदिन आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वे मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. आज ५९ व्या स्मृतिदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित वार्ता कानी येईल. व्यवसायात बदलांना अनुकूलता राहील. कौटुंबिक ताण दूर करता येईल.
- **वृषभ** : अनपेक्षित घटनांनी विचलित व्हाल. पुरेसा संयम बाळगावा. ज्येष्ठांचं मार्गदर्शन अवश्य घ्यायला हवं.
- **मिथुन** : बेरोजगारांना अपेक्षित दिलासा मिळेल. जुनी येणी वसूल होतील. प्रेम प्रकरणात अनुकूलता राहील.
- **कर्क** : आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. महत्त्वाच्या भेटी लांबणीवर पडतील. जुन्या स्मृतींना उजाळा मिळेल.
- **सिंह** : महत्त्वाचे निर्णय विचारपूर्वक घ्यावे. दूरचे प्रवास सध्या टाळावेत. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल.
- **कन्या** : व्यवसायात नवी आव्हानं समोर येतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. विचारानं रहायला हवं.
- **तूळ** : प्रलंबित कामांना गती मिळेल. नव्या योजना मनासारख्या मार्गी लागतील. मानसिक स्वास्थ लाभेल.
- **वृश्चिक** : गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. स्वमताग्रह टाळायला हवा. अनपेक्षित घटनांनी चिंता राहील.
- **धनु** : भावंडांचं उत्तम सहकार्य राहील. व्यवसायात अनुकूलता राहील. स्थावर प्रश्नातून मार्ग निघेल.
- **मकर** : अनावश्यक खर्च टाळायला हवा. भागीदारी व्यवसायात वाद संभवतात. पित्ताचे विकार संभवतात.
- **कुंभ** : दिवसाची सुरूवात उत्तम होईल. कामांना अपेक्षित गती मिळेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मीन** : थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. आध्यात्मिकतेकडे ओढा राहील. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल.

## ११ जानेवारी

दिनविशेष

- **१९४४** : काऊंट सिअनो या मुसोलिनीच्या जावयास मुसोलिनीच्या आज्ञेवरुन फितूर म्हणून मारण्यात आले. तो इटलीचा परराष्ट्रमंत्री होता.
- **१९५४** : चंद्रकांत भोंजाळ या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी अनुवादकाचा जन्मदिन.
- **१९६६** : भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री ताश्कंद करारासाठी रशियाला गेले असताना आकस्मितरित्या मृत्यू पावले.
- **२०१३** : डॉ. अनिल काकोडकर यांचा महाराष्ट्रभूषण पुरस्काराने गौरव.

## आरोग्यमंत्र — गुणकारी स्ट्रॉबेरी

आपल्याकडे विशिष्ट ऋतूत विशिष्ट फळांचा हंगाम असतो. साहजिक त्या त्या ऋतूत त्या विशिष्ट फळांचं अवश्य सेवन केलं जातं. त्यातील समाधानही काही वेगळंच असतं. थंडीच्या ऋतूचा विचार करायचा तर या दिवसात बाजारात लालचुटूक आणि रसाळ 'स्ट्रॉबेरी' ग्राहकांचं लक्ष वेधून घेतात. स्ट्रॉबेरी पाहताक्षणीच खावीशी वाटते. आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत गुणकारी अशी याची ओळख आहे. स्ट्रॉबेरी हे मेंदूचं खाद्य असल्याचं तज्ज्ञ सांगतात. भरपूर 'अँटीऑक्सिडंट्स' असल्याने स्ट्रॉबेरीच्या सेवनाने मेंदूची क्षमता वाढते. पाहू याचे अन्य लाभ...

* दिवसाला तीन- चार स्ट्रॉबेरी खाल्ल्याने स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढायला मदत होते. * स्ट्रॉबेरी हे पोटॅशियम आणि 'क' जीवनसत्त्वाने समृद्ध फळ आहे. हे दोन्ही घटक तुम्हाला उत्साही राखण्यात मदत करतात. * वाढत्या वयात त्वचेवर सुरकुत्या पडतात. पण स्ट्रॉबेरीमुळे या सुरकुत्यांचं प्रमाण कमी होतं. * स्ट्रॉबेरी खाल्ल्याने रोगप्रतिकारक क्षमता वाढते. * हार्मोन्सचं संतुलन तसंच हाडांच्या आरोग्यासाठी स्ट्रॉबेरीचा आहारात समावेश करायला हवा. * स्ट्रॉबेरीच्या सेवनाने शरीरावरील सूज कमी होते. * स्ट्रॉबेरीत कॅन्सरपासून बचाव करण्याची क्षमता आहे. * गरोदर महिलांच्या आरोग्यासाठीही स्ट्रॉबेरी उपयुक्त आहे. * केस आणि त्वचेचं आरोग्य राखण्यातही स्ट्रॉबेरी महत्त्वाची भूमिका बजावते.



## महत्त्वपूर्ण काही... — एडिसनचं शिक्षण

समाजाला नवी दिशा, नवा विचार देणारी अनेक माणसं होऊन गेली. त्यांची प्रयोगशीलता, विद्वत्ता, बुद्धिमत्ता आणि प्रचंड परिश्रम यामुळेच व्यवस्थेची घडी चांगल्या पद्धतीने बसली. थॉमस अल्व्हा एडिसन हा अशांपैकीच एक. त्यानं विजेच्या दिव्याचा शोध लावला. ग्रामोफोनसारखे त्याचे शोधही प्रसिद्ध आहेत. ११ फेब्रुवारी १८४७ रोजी अमेरिकेतील ओहायो राज्यामधील मिलान या गावी एडिसनचा जन्म झाला. तो फक्त तीन महिने शाळेत गेला. कारण वर्गशिक्षकांनी हा अत्यंत निर्बुद्ध विद्यार्थी असल्याचा शिक्का मारल्यामुळे त्याला शाळा सोडावी लागली. घरी बसलेल्या एडिसनच्या खोड्यांमुळे घरातील माणसं वैतागत. म्हणून त्याने पोटमाळ्यावर छोटीशी प्रयोगशाळा थाटली. तिथे लागणारी रसायनं विकत घेण्यासाठी थॉमस वर्तमानपत्र विकायचा. १८६२ मध्ये एडिसनने एक मुलगा ट्रकखाली येत असल्याचं पाहिलं आणि धावत जाऊन उचलून घेत त्याचे प्राण वाचवले. तो स्टेशनमास्तर मॅकेंझी यांचा मुलगा होता. त्यांनी कृतज्ञतापूर्वक थॉमसला आगगाडीच्या तारायंत्राचे शिक्षण दिलं आणि टेलिग्राफ ऑपरेटर म्हणून कामावर घेतलं.

## सल्ला मोलाचा — ऑईली स्किन?

त्वचा तेलकट होण्याची समस्या अनेकींना असते. सकाळी ताजातवाना वाटणारा चेहरा दुपार, संध्याकाळपर्यंत अगदी तेलकट होऊन जातो. अशा वेळी क्रीम न लावणे हा एकमेव उपाय असू शकत नाही. * त्वचा तेलकट असली की चेहरा सारखा धुण्याचा सल्ला दिला जातो. पण चेहरा सारखा धुतल्याने त्वचा जास्तच तेलकट होते. कोरडेपणा टाळण्यासाठी त्वचा नैसर्गिक तेल निर्माण करते. त्यामुळे सकाळी किंवा संध्याकाळी फक्त एकदाच चेहरा फेस वॉशने धुवा. * चेहऱ्याला काकडीचा रस लावणे हा तेलकट त्वचेवरचा उत्तम उपाय ठरतो. काकडीत 'अ' आणि 'इ' जीवनसत्त्वं तसंच मॅग्नेशियम असतं. यामुळे त्वचेला थंडावा मिळतो. काकडीच्या काही विशेष गुणधर्मामुळे त्वचेची नैसर्गिक तेलनिर्मितीची प्रक्रिया मंदावते. * लिंबू, संत्रं यासारख्या आंबट फळांचा रस चेहऱ्याला लावल्यामुळे त्वचेच्या तेलकटपणापासून मुक्ती मिळू शकते. लिंबाच्या रसामुळे त्वचेचा काळपटपणाही कमी होतो. * शक्यतो नैसर्गिक फेसवॉशचा वापर करा. यासोबतच चेहरा साबणाने धुवू नका. साबणामुळे त्वचा खूप कोरडी होते आणि नंतर तेलकट दिसू लागते.

## पंचांग

**शनिवार, ११ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष शु. १२/१३, नक्षत्र : रोहिणी
चंद्रराशी : वृषभ, शुक्ल योग
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.१८

## फॉरवर्डस

सुख अगदी दारापर्यंत येतं आणि हुलकावणी देऊन निघून जातं...

**दस्तक देकर दरवाजे पर**
**छुप जाती हैं अक्सर**
**किसी नटखट बच्चे सी है**
**मेरे हिस्से की खुशियाँ**

## वाचा तर खरं

इस्त्री करताना अधिक चांगले परिणाम मिळावेत यासाठी अॅल्युमिनियम फॉईलचा वापर करावा. कपड्यांच्या खाली अॅल्युमिनियम फॉईल ठेवल्यास उष्णता परावर्तीत होते आणि कपडे अधिक चांगल्या प्रकारे प्रेस होतात. अॅल्युमिनियम फॉईल आणखी बऱ्याच प्रकारे वापरता येते. उदा. कोनमधून आईस्क्रीम खाताना कपडे खराब होऊ नयेत यासाठी कोन फॉईलमध्ये रॅप करावा. छोट्या मुलांच्या बिछान्यावर बेडशीटच्या खाली ही फॉईल पसरुन ठेवावी. म्हणजे गादी ओली होण्याचा धोका कमी होईल.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

» Selected

## कमरेला पिस्तुल लावून फिरणारा जेरबंद

**शिक्रापूर :** शिरुर शहरात कमरेला बेकायदेशीरपणे पिस्तुल लावून फिरणाऱ्या सराईत गुन्हेगाराच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला यश आले असून निखील सतीश



थेऊरकर असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या सराईताचे नाव आहे. शिरुर शहरात रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असलेला निखील थेऊरकर हा कमरेला बेकायदेशीरपणे पिस्तुल लावून फिरत असल्याची माहिती स्थीनिम गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाला मिळाली, त्यांनतर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, शिरुरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ, पोलीस हवालदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजय जाधव, राजू मोमीन, मंगेश थिगळे यांनी शिरुर शहरात सापळा रचत शिरुर येथील बाह्य वळण रस्त्यालगत निखील यास ताब्यात घेत झडती घेतली असता, त्याच्या कमरेला पिस्तुल मिळून आले. दरम्यान पोलिसांनी निखील सतीश थेऊरकर याच्याकडील पिस्तुल व दोन जिवंत काडतुसे जप्त केली तसेच त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला.

# सोमेश्वरकडून सभासदांची दिशाभूल

## निंबुत येथे शनिवारी आक्रोश सभेचे आयोजन, सतिश काकडे यांची माहिती

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नीरा :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सह. साखर कारखान्याने पहिली उचल २ हजार ८०० रूपये प्रति.मे.टन जाहीर केली. उर्वरीत ३२० ते ३५० रूपये कारखाना बंद होताच देणार असून उशीरा गाळप झालेल्या उसास अनुदान देखील देणार असल्याचे जाहीर केले. मात्र सोमेश्वरने सभासदांची दिशाभुल करून सभासदांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. यासंदर्भात पुढील दिशा ठरविण्यासाठी शनिवारी ११ जानेवारीला निंबुत ( ता.बारामती) येथेशेतकरी कृती समितीच्या वतीने आक्रोश सभेचे आयोजन करण्यात आले असून सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन कृती समितीचे अध्यक्ष सतिश काकडे यांनी केले आहे.

कृति समितीचे अध्यक्ष सतिश काकडे यानी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, कृती समितीचे ७ ते ८ जणांचे शिष्टमंडळ रविवार दि. ५ जानेवीरीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पहिली उचल, कायद्याप्रमाणे दिड महिन्याचे व्याज मिळणे बाबत, आडसाली उसाचे गाळप पुर्ण होईपर्यंत गेटकेन उस तात्काळ बंद करावा. ज्या सभासदांच्या उसाचे गाळप झाले आहे. ज्या शेतकऱ्यांच्या सोसायटया (पिक कर्ज) बाकी आहे. त्या सभासदांचे उसबील कर्जमाफी होणार असल्याने कारखान्यावर अनामत म्हणुन ठेवण्यात याव्यात या मागण्याचे निवेदन देवुन भेटले.

या चर्चेदरम्यान सोमेश्वर, माळेगाव व छत्रपती या तीनही कारखान्याचे चेअरमन, संचालक मंडळ मिटींगला उपस्थित होते. पहिल्या उचली बाबत चर्चा होत असताना, अजित पवार यांनी तिन्ही कारखान्याचे चिफ अकौंटंट व कार्यकारी संचालक यांना कारखान्याचे सर्व कागदपत्रे घेवुन मंगळवारी दि. ७ रोजी दुपारी ३ ते ३.३० वा मुंबई येथील राष्ट्रवादी भवन कार्यालयात येण्याच्या सुचना दिल्या. या दरम्यान कृती समितीलाही बोलवण्यात आले होते. त्यावेळी कृती समितीच्या वतीने आम्ही अजित पवार यांना भेटलो असता सोमेश्वर कारखान्याच्या कागदपत्राच्या आधारे सोमेश्वरची पहिली उचल २ हजार ८०० प्रति मे.टन देण्यास सांगितले आहे, असे आम्हास सांगितले. रविवारी जे निवेदन शेतकरी कृती समितीने दिले आहे त्यावर सगळी परिस्थिती पाहुन सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून शक्य तेवढी मदत शेतकऱ्यांना करणे बाबत आश्वासन अजित पवार यांनी दिले होते. त्यावरून चेअरमन व कार्यकारी संचालक यांचे काहीतरी फार मोठे गौडबंगाल सुरू आहे. कारण पहिल्या उचली बाबत संचालक मंडळाची मिटींग झाली होती. त्यामध्ये पहिली उचल ३ हजार ते ३ हजार १०० रूपये आपण देवु शकतो अशी चर्चा संचालक मडळामध्ये झाली होती. तसेच गेल्या १० वर्षाचा इतिहास आपण पाहिल्यास महाराष्ट्रात सोमेश्वरने उच्चांकी दर दिला आहे. कोल्हापुर जिल्हयातील काल्लापाण्णा आवाडे कारखाना ३ हजार १५० रूपये , वारणा सहकारी साखर कारखाना ३ हजार२२० रूपये तसेच सोमेश्वर शेजारील साखरवाडी येथील कायम अडचणीत असलेला दत्त इंडीया कारखाना यांनी ३ हजार १०० रुपये पहिली उचल दिली आहे. मग सोमेश्वर कारखान्याने पहिली उचल २ हजार८०० रूपये देणे कितपत योग्य वाटत आहे.

या बाबींवर चर्चा करण्यासाठी व पुढील दिशा ठरविण्यासाठी सर्व सभासदांनी शनिवारी, ११ तारखेला,निंबुत येथील साहेबरावदादा सोसायटी बाबा कमल सभागृह येथे सकाळी १०.०० वा मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यचे आवाहन शेतकरी कृती समितीच्या वतीने करण्यात येत आहे.

## पिंपळे जगताप मधून कामाला गेलेला युवक बेपत्ता

**शिक्रापूर :** पिंपले जगताप येथील सुजित कुलकर्णी हा चाकण



येथील कंपनीत कामाला असल्याने तो कंपनीत गेलेले होता. दुसऱ्या दिवशी सुजित घरी आला नसल्याने, त्याच्या पत्नीने मोबाईलवर संपर्क केला असता, संपर्क झाला नसल्याने, त्याच्या पत्नीने कंपनीत जाऊन चौकशी केली. मात्र, सुजित कंपनीत नसल्याचे समजले. दरम्यान सुजितचा सर्व नातेवाईक व मित्रांकडे शोध घेतला असता तो कोठेही मिळून आला नाही. याबाबत सुजितची पत्नी वैभवी सुजित कुलकर्णी हिने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिली. बेपत्ता सुजितचे वर्णन उंची, पाच फुट दहा इंच, रंग गोरा, मध्यम बांधा, उभट चेहरा, काळे केस, अंगात निळ्या रंगाचा शर्ट व पांढऱ्या रंगाची प्यांट असे वर्णन असून याबाबत शिक्रापूर पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## ग्रामपंचायतींचे काम बंद आंदोलन

**खेड :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ गुरुवारी राज्यभर ग्रामपंचायतींचे काम बंद आंदोलन केले. अखिल भारतीय सरपंच परिषद याप्रकरणी आक्रमक झाली आहे. परिषदेच्यावतीने संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहून काम बंद आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. सरपंच परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष शशिकांत मोरे यांनी खेड तालुक्याच्या दौंडकरवाडी येथे त्यांना श्रध्दांजली वाहिली. अखिल भारतीय सरपंच परिषदेच्यावतीने खेड तालुक्यातील बहुळ ग्रामपंचायतीचे काम बंद करत आंदोलनाला सुरुवात करण्यात आली जिल्ह्यात गुरुवारी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ सर्व ग्रामपंचायत बंद ठेवण्यात आल्या. यावेळी आंदोलन करून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी सरपंचासाठी वेगळा संरक्षण कायदा राज्य सरकारने करावा अशी मागणी सरपंच शरद मोहिते, सरपंच दौलत मोरे, सरपंच सीताराम गुजर व खेड तालुक्यातील सरपंचांनी केली आहे.

### संरक्षण कायदा लागू करा

● संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी झाली पाहिजे, देशमुख कुटुंबातील एका सदस्याला सरकारी नोकरीत समाविष्ट करावे, सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवकांना संरक्षण कायदा लागू करावा यासह विविध मागण्या करत काम बंद आंदोलन सुरू केल्याची माहिती सरपंच परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष शशिकांत मोरे यांनी दिली.

# विरोधकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**बारामती :** आम्ही सरकार प्रतिनिधी या नात्याने नेहमीच महिला सक्षमीकरणावर भर दिला आहे. त्यातूनच लाडकी बहिण योजना आली त्यामुळे महिलांना मोठा आर्थिक आधार निर्माण झाला सध्या समाजात लाडकी बहिण योजने बद्दल वेगळी चर्चा चालू आहे योजना बंद होणार, योजनेचे काही खरे नाही, मात्र मी सांगतो लाडकी बहिण योजना ही योजना गरजु आणि गरिबांच्या साठी आहे. त्यामुळे योजना सुरूच राहणार विरोधकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका, असे आश्वासन लाडक्या बहिणींना या निमित्ताने देतो असा उपस्थित महिलांना शब्द उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलताना दिला.

सेवा निवृत्त वरिष्ट पोलिस निरीक्षक स्व. अर्जुनराव बाजीराव काळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ, कै. वस्ताद बाजीराव काळे तालीम दहीहंडी संघ बारामतीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. ऋतुराज अर्जुनराव काळे यांच्या वतीने एक हजार महिलांना मिक्सर वाटपाचा कार्यक्रम उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता त्यावेळी पवार बोलत होते. यावेळी डॉ. ऋतुराज अर्जुनराव काळे, डॉ. गोकुळ काळे माजी नगरसेवक किरण गुजर, सुनील काळे, डॉ रणजीत मोहिते, किशोर सूर्यवंशी, बन्सीलाल मुथा आदी उपस्थित होते.

गेली अनेक वर्षापासुन काळे कुटुंबीय हा कार्यक्रम राबवीत आहेत, काळे कुटुंबीय हे नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत नेहमीच समाजोपयोगी कार्यक्रम घेत असतात आपल्याकडे असलेल्या संपत्तीतून सामाजिक बांधिलकी जपत समाजाला देण्याची भावना नेहमीच काळे कुटुंबियांची असते त्याबद्दल मी डॉ. ऋतुराज काळे आणि त्यांच्या कुटुंबियांचे कौतुक करतो असेही पवारांनी व्यक्त केले तर कृष्णा शिंदे, किशोर सूर्यवंशी, रणजीत काळे, सुशांत काळे, डॉ. पूर्णानंद काळे, सचिन अंधारे, यानी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

## बेकायदा वृक्षतोड रोखण्यासाठी निवेदन



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** अवसरी खुर्द (ता. आंबेगाव) येथील गावात होत असणारी अनधिकृत, विनापरवानगी वृक्षतोड तत्काळ बंद करावी, संपूर्ण गावात घनकचरा व्यवस्थापन करावे, निसर्ग प्रतिष्ठानमार्फत मुधारा डोंगर येथे लावलेल्या झाडांच्या संगोपनासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत पंचायत समितीमार्फत मजूर उपलब्ध करून द्यावेत, या मागणींचे निवेदन आम आदमी पार्टीच्या वतीने सरपंच वैभव वायाळ आणि ग्रामसेवक यांना देण्यात आल्याची माहिती आम आदमी पक्षाचे महा सचिव वैभव टेमकर यांनी दिली.

अवसरी खुर्द ग्रामपंचायतमध्ये वृक्षतोडबंदीचा प्रस्ताव ग्रामसभेत मांडून त्या दृष्टीने ग्रामपंचायतीने सकारात्मकता दाखवली आहे. घनकचरा व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपाय योजना म्हणून सर्वे नंबर ५२ येथे कचरा वर्गीकरण शेड उभारावे. तेथे ओला व सुका कचरा वेगळा करून कचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर प्रयत्न करून मार्ग काढला जाईल, असे आश्वासन दिले आहे.

तसेच गावात इतरत्र पडलेला कचरा उचलून त्याची तात्काळ विल्हेवाट लावली जाईल या दृष्टीने काम सुरू करण्यात आले आहे.एक एप्रिल २०२५ पासून सुरू होणाऱ्या कार्यालयीन वर्षाच्या सुरुवातीपासून मजूर उपलब्ध करून देण्यासंदर्भात कागदपत्रांची पूर्तता करण्यात आल्याचे सरपंच वैभव वायाळ आणि ग्रामसेवक जगन्नाथ शिदोरे यांनी कळविले आहे.

## खो-खो च्या आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी किरण वाघ यांचा सत्कार



**रांजणी :** रांजणी (ता. आंबेगाव) येथिल नरसिंह विद्यालयाचे माजी खो खो खेळाडू किरण वाघ यांची खो खो खेळाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तांत्रिक अधिकारी पदी नियुक्ती झाली आहे. नरसिंह विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला, अशी माहीती विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी दुंडे यांनी दिली. पुणे जिल्हा खो खो असोसिएशन व महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन यांच्या माध्यमातून सोमवार (दि.१३) ते सोमवार (दि. १९) या कालावधीत दिल्ली येथिल इंदिरा गांधी स्टेडियममध्ये पहिली जागतिक अजिंक्य खो खो (वर्ल्ड कप) स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेत महिला व पुरुष अशा दोन गटांमध्ये जगभरातील देशांमध्ये ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय तांत्रिक अधिकारी म्हणून किरण वाघ यांची निवड झाली आहे. किरण वाघ हे नरसिंह विद्यालयाचे माजी विद्यार्थी तसेच खो-खो खेळाडू आहेत. या सत्कार प्रसंगी स्कूल कमिटी सदस्य मधुकर हांडे, एकनाथ भोर, बंडेश वाघ, विद्यालयाचे पर्यवेक्षक राजेंद्र पडवळ, शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष नम्रता भोर, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष गणेश वाघ, संतोष वाघ सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# पुणे-पंढरपूर पालखी मार्गावर अपघाताचे सत्र सुरूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुणे-पंढरपूर पालखी मार्गावर अपघाताचे सत्र सुरूच असून, या मार्गावर सातत्याने लहान मोठे अपघात होत असतात. यात अनेकांचे प्राण गमवावे लागले आहेत. जाधववाडी येथे शुक्रवार दुपारी बाराच्या सुमारास सासवड वरून दुचाकीवरून निघालेले विजय आबा कोंढाळकर यांच्या दुचाकीला हिरकणी बसने जोरदार धडक दिल्याने ते जागीच ठार झाले.

झेंडेवाडी ते सासवड पालखी मार्ग अत्यंत धोकादायक झाला असून, या मार्गावर सातत्याने मोठ्या प्रमाणात रहदारी असते. रस्ता रुंदीकरणाचे काम काही ठिकाणी झाले असून, काही ठिकाणी पुलाचे काम सुरू आहे. याच मार्गाने अनेक लहान मोठे अपघात होऊन अनेकांचे प्राण गमवावे लागले आहेत काहींचे तर संसार उद्धवस्त झाले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभाग कोणत्याही प्रकारचे लक्ष घालत नसल्याने, नाहक दुचाकीस्वारांना आपले प्राण गमवावे लागत आहेत. या साठी प्रशासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे असुन, पालखी मार्ग जोपर्यंत सुरळीत व चांगला होत नाही तोपर्यंत या मार्गावर फिरते पथक तैनात करण्याची गरज आहे. त्याशिवाय, ठिकठिकाणी दिशादर्शक फलक लावण्यात यावेत तसेच, ते स्पष्ट दिसतील असे लावणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

## तक्रार मागे घेण्यासाठी महिलेला दमदाटी

**शिक्रापूर :** कोंढापुरी येथील एका महिलेवर श्रावण पालोदकर याने केलेल्या अत्याचाराबाबत पिडीत महिलेला केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी श्रावण पालोदकर याच्यावर गुन्हा दाखल करत त्याला अटक केली. काही दिवसांनी श्रावण जामिनावर बाहेर आलेला असताना त्याने पिडीत महिलेला पुन्हा रस्त्यात अडवून महिलेची छेडछाड करत महिलेले त्याच्या विरुद्ध दाखल केलेली अत्याचाराची तक्रार मागे घेण्यासाठी तिला दमदाटी केली. घडलेल्या घटनेबाबत महिलेने पुन्हा शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी श्रावण गणपतराव पालोदकर याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार किरण निकम या करत आहे.

## सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घ्यावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** महिला शेतकऱ्यांनी स्वावलंबी होण्याच्यादृष्टीने शेतकरी बचत गटाच्या माध्यमातून लघू कृषीपूरक व्यवसाय उभारावेत, याकरीता प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी तुळशीराम चौधरी यांनी केले.

निरावागज येथे हरभरा पिकाबाबत आयोजित 'महिला शेतीशाळा' प्रसंगी ते बोलत होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी सुप्रिया बांदल, मंडळ कृषी अधिकारी सुभाष बोराटे, कृषी पर्यवेक्षक संतोष पिसे, प्रतापसिंह शिंदे, कृषी सहायक ज्योती गाढवे यांच्याह शेतकरी उपस्थित होते.

शिंदे यांनी हरभरा पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन तसेच सेंद्रिय शेती विषयक मार्गदर्शन केले. हरभरा पीक क्षेत्राला प्रत्यक्ष भेट देवून सापळे (ट्रॅप), पक्षी थांबे, चिकट सापळे, सापळा पिके, आंतरपिके याविषयी मार्गदर्शन केले.

यावेळी चौधरी यांनी शेतकरी कविता भोसले यांना महाडिबीटी पोर्टलअंतर्गत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान योजनेतून मिळालेल्या 'रोटावेटर' या औजाराचा त्या कसा लाभ घेत असल्याची माहिती जाणून घेतली. मंडळ कृषी अधिकारी बोराटे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांविषयी मार्गदर्शन केले. या शेती शाळेसाठी निरावागज येथील जिजामाता महिला शेतकरी गट, अहिल्या महिला शेतकरी बचत गटाचे पदाधिकारी उपस्थित होते.



पारगाव येथिल भीमाशंकर कारखान्याला ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या चिमुकल्यांनी भेट दिली.

## चिमुकल्यांची भीमाशंकर कारखान्यात भेट

### ठाण्यातील जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल

**रांजणी :** पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यात ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील आंबळे खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या चिमुकल्यांनी भेट देऊन साखर, निर्मिती, वीजनिर्मिती प्रकल्पांची पाहणी केली.

सध्या भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचा गाळप हंगाम सुरू आहे. या दिवसांमध्ये सर्वत्र शैक्षणिक सहली सुरू आहेत. अष्टविनायक महामार्गावर भीमाशंकर कारखाना आहे. अनेक शाळांच्या सहली या मार्गावरूनच जात असतात. ठाणे जिल्ह्यातील आंबळे खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी शुक्रवारी (दि.१०) कारखान्यात भेट देऊन कारखान्यात साखर कशी तयार होते.तसेच वीज निर्मिती प्रकल्पाची पाहणी केली.

भीमाशंकर कारखान्याचे सेक्रेटरी रामनाथ हिंगे, विठ्ठल ढोबळे, विश्वंभर वाल्मिक यांच्या वतीने विद्यार्थ्यांना चहापाणाची सोय करण्यात आली.

# शिरदाळे येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीर संपन्न झाले. गेल्या सात दिवसांपासून शिरदाळे पारगाव कारखाना येथील दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबीराचा समारोप करण्यात आला.

शनिवारी (दि. ४) या शिबिराचा शुभारंभ भीमाशंकर सहकारी साखर कारखाना तथा भीमाशंकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भगवानराव बेंडे पाटील तसेच उपाध्यक्ष ॲड. प्रदीप वळसे पाटील आणि सर्व संचालक मंडळाच्या उपस्थितीत करण्यात आला होता. यावेळी शिरदाळे गावातील ग्रामस्थांवर आणि सर्व तरुण सहकाऱ्यांवर विश्वास ठेवून या शिबिराचे आयोजन शिरदाळे येथे आयोजित करण्यात आल्याचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. छत्रूघ्न थोरात, बबन चव्हाण, वसंत जाधव, माजी सरपंच मनोज तांबे, गणेश तांबे, माजी उपसरपंच मयुर सरडे, सोसायटी संचालक जयदीप चौधरी, माजी चेअरमन कांताराम तांबे, कोंडीभाऊ तांबे, विठ्ठल तांबे गुरुजी, ह.भ.प.तान्हाजी महाराज तांबे, जयश्री तांबे, बाळासाहेब रणपिसे, सुभाष तांबे, विलास तांबे, बाळासाहेब चौधरी, सखाराम तांबे, प्रभाकर तांबे तसेच ग्रामस्थ आणि तरुण सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेली सात दिवस सर्व विद्यार्थी स्वयंसेवकांनी गावात स्वच्छता, झाडांना पाणी, शिवार भेट, सकाळी व्यायाम, व्याख्यानमाला, चर्चासत्र आशा विविध उपक्रमांचा समावेश करून हे शिबीर अधिक उत्साही बनविले होते.

यावेळी मनोज तांबे, मयुर सरडे, कांताराम तांबे,कोंडीभाऊ तांबे,शिवाजी सरडे,बाळासाहेब तांबे,मुख्याध्यापक दिलीप गाढवे ,अंगणवाडी सेविका शांताबाई चौधरी,जयश्री रणपिसे हे उपस्थित होते. यावेळी विद्यालयाच्या वतीने देखील सर्व विद्यार्थ्यांची सर्व व्यवस्था ग्रामस्थांनी व्यवस्थितरीत्या पाहिल्याबद्दल ग्रामस्थांचे देखील आभार मानण्यात आले.

### रस्ता सुरक्षा अभियानाविषयी इंदापुरात जनजागृती

# सुरक्षित आयुष्यासाठी नियमांचे पालन आवश्यक


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**इंदापूर :** जीवन अनमोल आहे. त्यामुळे सुरक्षित आयुष्य जगण्यासाठी सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करणे ही काळाची गरज आहे. असा संदेश इंदापूर विद्या प्रतिष्ठान पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये रस्ते सुरक्षा अभियानातून देण्यात आला.

रस्ते अपघातात बळी जाणाऱ्या नागरिकांची लक्षवेधी संख्या लक्षात घेवून रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक वाहतुकीच्या नियमांचे पालन व्हावे, हेल्मेट व सीट बेल्ट याचा वापर वाहन धारकांनी करावा याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याकरिता विद्या प्रतिष्ठान पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये स्टुडन्ट मेंटेरिंग सिस्टीम अंतर्गत रस्ते सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ७ रोजी करण्यात आले. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बारामती व विद्या प्रतिष्ठान पॉलिटेक्निक कॉलेज इंदापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास मोटार वाहन निरीक्षक पद्माकर भालेकर, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक तेजस मखरे व रोहित भोसले तसेच इंदापूर येथील पोलीस कॉन्स्टेबल सुहास करणे, अमोल खाडे, अनिल नागरगोजे हे अधिकारी उपस्थित होते.

या जनजागृती पर कार्यक्रमामधून सिग्नलचे अवश्य पालन करा, गाडी चालवताना मोबाईल बोलू नका, कानाला हेडफोन लावू नका, गाडी चालवताना वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करा याविषयी विद्यार्थ्यांना विविध उदाहरणे देवून माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन स्टुडन्ट मेंटेरिंग सिस्टीम चे प्रिसायडिंग ऑफिसर प्रा. राजीव वाघमारे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बारामती येथील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम, पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, महाविद्यालय प्राचार्य डॉ. सुजय देशपांडे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.




## बनवा घरट्याची प्रतिकृती

फन टाईम

छोट्या दोस्तांनो, नव्या वर्षात काही तरी वेगळं करायचंय का? मग नेचर वॉकला चला. अभयारण्यात जाऊन पक्षी बघा. जवळच्या डोंगरावरही जाता येईल. सकाळी लवकर उठलात तर घराच्या बाहेरही विविध पक्षी दिसू शकतील. मित्रांनो, पक्षी घरटी तयार करतात. एवढी छान, सुबक आणि मजबूत घरटी त्यांना कशी बरं बांधता येत असतील, असा प्रश्न पडलाय का कधी? पडला असेल तर पक्ष्यांच्या घरट्याची कलाकृती तयार करून याचं उत्तर जाणून घेऊ शकता. यासाठी काही वस्तू जमवाव्या लागतील. पक्षी जमवतात अगदी तश्शाच! मग बनवायचं ना



घरटं?

साहित्य : पानं, पालापाचोळा, कळ्या, फुलांचे देठ, काटक्या, काड्या, पिसं, गवत आणि भुसा. एखाद्या अभयारण्यात जाणार असाल तर सोबत पिशवी घेऊन जा. या वस्तू जमवा. गम, कागदी पिशवी, ब्राऊन पेपर, कापडी पोत्यासारखं कापड, रंगीत कागदी प्लेट, गुगली आईज, पक्ष्यांचे आकार कापण्यासाठी कागद, कात्री इत्यादी.

कृती : सर्वात आधी घरट्यासाठी लागणाऱ्या वस्तू तुम्हाला जमवायच्या आहेत. तुमच्याकडील कागदाचे पक्ष्यांचे आकार कापा किंवा पक्ष्याच्या चित्राची प्रिंटही काढता येईल. आकार कापून घ्या. आता तुम्हाला पक्ष्याचं घरटं तयार करायचं आहे. यासाठी पोत्याचं जाड कापड घ्या. हे कापड अर्धगोल आकारात कापा. आता हा तुकडा पेपर प्लेटच्या खालच्या भागात चिकटवा. आता त्यावर पक्षी चिकटवा. नंतर पोत्याच्या तुकड्यावर इतर वस्तू चिकटवता येतील. काटक्या, काड्या, कापूस, पिसं, वाळलेली पानं, फुलं, देठ या सगळ्या वस्तू चिकटवा. पेपर प्लेट अजून सजवायची असेल तर अशाच काड्या, पानं, फुलं चिकटवता येतील. पांढऱ्या कागदाचे अंड्याचे आकार कापा. पक्ष्याच्या खाली ते चिकटवता येतील. आता तुमची कल्पकता वापरा आणि इतर सजावट करा. गम पूर्णपणे वाळू द्या. ही कलाकृती घरात ठेवता येईल किंवा कुणाला गंमत म्हणून भेटही देता येईल.

## लिथुआनियाविषयी...

सफर देशांची


युरोप खंडातल्या बऱ्याच छोट्या देशांपैकी एक म्हणजे लिथुआनिया. उत्तर युरोपातला हा देश बाल्टिक समुद्राच्या पूर्व किनाऱ्यावर वसला आहे. या देशाची लोकसंख्या ३० लाखांच्या घरात आहे. 'लिथुआनियन' ही इथली प्रमुख भाषा. देशातले ८२ टक्के लोक ही भाषा बोलतात. 'व्हिल्नियस' या देशाची राजधानी आणि सर्वात मोठं शहर. १७९५ मध्ये लिथुआनिया रशियन साम्राज्याचा भाग झाला. १६ फेब्रुवारी १९१८ या दिवशी हा देश स्वतंत्र झाला. पण लिथुआनियावर आक्रमणं सुरूच राहिली. १६ जून १९४० या दिवशी 'सोव्हिएत युनियन'ने या देशाचा ताबा घेतला. १९४१ ते १९४४ या काळात लिथुआनियावर नाझी जर्मनीचं राज्य



होतं. १९४४ पासून १९९० पर्यंत हा देश पुन्हा 'सोव्हिएत युनियन'च्या ताब्यात होता. ११ मार्च १९९० या दिवशी लिथुआनियाला स्वातंत्र्य मिळालं.

हा देश नाटो आणि युरोपियन युनियनचा सदस्य आहे. या देशाला ९९ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. 'नेमुनास' ही या देशातली सर्वात मोठी नदी. लिथुआनियाचा बराचसा भाग सपाट आहे. देशात ३३ टक्के वनसंपदा आहे. या देशात बरेच तलावही आहेत. भरपूर जंगल असल्यामुळे इथे लाकूड उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. या देशात पाच राष्ट्रीय तर ४०२ निसर्ग उद्यानं आहेत. देशात वन्य प्राणीही मोठ्या प्रमाणावर आहेत. निसर्गसौंदर्याने नटलेल्या या देशात पर्यटक मोठ्या संख्येने येतात. युरोपातल्या इतर देशांप्रमाणे युरो हे इथलं प्रमुख चलन असलं तरी 'लिथुआनियन लिटास' या चलनाचा वापरही केला जातो.

ठिपके जुळवा



## सोनं का गंजत नाही?

जाणून घ्या

लोखंडाच्या वस्तू पटकन गंजतात. पण सोन्याच्या दागिन्यांवर गंज चढत नाही. कितीही वापरले तरी सोन्याचे दागिने खराब होत नाहीत. लोखंड आणि सोनं हे दोन्ही धातू असले तरी लोखंडाप्रमाणे त्यावर गंज का चढत नाही, असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. चला तर मग याचं कारण जाणून घेऊ या.

सोनं हा एक निष्क्रिय धातू आहे. त्यामुळे त्याचा वातावरणातल्या कोणत्याही घटकाशी किंवा वायुशी संपर्क आला तर कोणतीही रासायनिक प्रक्रिया घडत नाही. लोखंडावर गंज चढण्यासाठी या धातूची वातावरणातल्या ऑक्सिजनशी प्रक्रिया व्हावी लागते. या प्रक्रियेनंतर आयर्न ऑक्साइडची निर्मिती झाल्याने लोखंड गंजतं. सोनं म्हणजे सुवर्ण निसर्गात शुद्ध स्वरूपात असतं. तसंच हा मऊ धातू आहे. मात्र दागिने घडवताना सोन्यात थोड्या प्रमाणात तांबं किंवा पितळ मिसळलं जातं. यामुळे या धातूला काठिण्य येतं आणि दागिने




तयार करणं सोपं होतं.

काही काळानंतर सोन्याच्या दागिन्यांची चमक कमी झाल्याचं आपल्याला जाणवतं. सोन्याची कोणत्याही वायुसोबत रासायनिक प्रकिया होत नसली तरी यात मिसळलेल्या इतर धातूंचा ऑक्सिजनशी संपर्क होऊन ऑक्साइडची निर्मिती होते. यामुळे सोन्याचे दागिने फिके दिसतात. मात्र या ऑक्साइड्सचा रंग लाल किंवा भुरकट नसतो. त्यामुळे दागिने लालसर दिसत नाहीत. सोन्यात कधीही लोखंड मिसळलं जात नाही.

## देखणे ब्लू सी ड्रॅगन

दोस्त हे मस्त

दोस्तांनो, प्राणी–पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे शोध सतत लागत असतात. काही तरी नवं सापडत राहतं आणि अशा जिवांविषयी कुतुहल वाढत राहतं. ऑस्ट्रेलियातील समुद्र किनाऱ्यावर 'ब्लू सी ड्रॅगन' नावाचा एक जलचर सापडलाय. या जलचराचे फोटो सोशल मिडियावर वायरल होत आहेत. हा जलचर क्वींसलँड येथील समुद्र किनाऱ्यावर सापडलाय. त्यामुळे संशोधकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. 'ब्लू सी ड्रॅगन' हा सागरी जीव असून तो उडू शकतो. त्यामुळेच त्याच्या अस्तित्त्वाबाबत कुतुहल निर्माण झालंय. 'ग्लॉसियस अटलांटियस' या जलचरांच्या प्रजातीतील अत्यंत दुर्मिळ असा हा जीव आहे. हा प्राणी माणसांच्या फारशा नजरेत आला नसला तरी त्याचं



सौंदर्य डोळ्यात भरणारं असतं. जेलीफिशप्रमाणे हा प्राणीही फार सुंदर आहे. असं असलं तरी याची गणना विषारी प्राण्यांमध्ये केली जाते. हा प्राणी चावला तर त्याच्या विषामुळे माणसाला त्रास होतो. हा जलचर आपल्या कल्ल्यांच्या मदतीने समुद्राच्या पृष्ठभागावर थोड्या उंचीवर उडू शकतो. या प्राण्याचा आकार फारच छोटा आहे. त्यातच याच्या निळ्याशार रंगामुळे तो पटकन दृष्टीस पडत नाही. या प्राण्याच्या शरीरावर चंदेरी रेषा असतात. या रेषाही समुद्राच्या पाण्याच्या रंगाशी मिळत्याजुळत्या असल्याने त्याच्या अस्तित्वाचा थांग लागत नाही. म्हणूनच शत्रूंपासून याचा अगदी सहज बचाव होतो. निळ्या सागरी ड्रॅगनचा आकार ४० मिलीमीटरपर्यंत वाढू शकतो. या प्राण्याचा आकार फारच वेगळा असल्याने सुरूवातीला आपला गोंधळ उडतो. पण ही कोणतीही वनस्पती नसून सजीव प्राणी असल्याचं आपल्या लक्षात येतं. हातांच्या तळव्यांवर ठेवल्यावर हा फारच छोटा दिसतो. हा सजीव नुकताच आढळल्याने त्यावर अजून संशोधन होईल. त्यानंतरच या प्राण्याचे रंगढंग आपल्या लक्षात येऊ शकतील.

## क्षेत्र हेल्थ मॅनेजमेंटचं

कोण होणार?



आरोग्य क्षेत्रात करीअर करण्यासाठी फक्त डॉक्टर हा एकमेव पर्याय नाही. हे क्षेत्र खूप मोठं आहे. इथे तुम्ही विविध प्रकारे काम करू शकता. व्यवस्थापन क्षेत्रात रस असेल तर हॉस्पिटल मॅनेजमेंट म्हणजे रुग्णालय व्यवस्थापनाकडे तुम्ही वळू शकता. हेल्थकेअर क्षेत्राची वाढ वेगाने होते आहे. त्यातच परदेशी कंपन्यांनीही या क्षेत्रात मोठी गुंतवणूक केल्याने रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. म्हणूनच तुम्ही हॉस्पिटल मॅनेजमेंटचा अभ्यासक्रम पूर्ण करून पुढे जाऊ शकता.

हॉस्पिटल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमापासून पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंतचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही कॉलेजेसमध्ये या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश परीक्षेचं आयोजन केलं जातं. हॉस्पिटल मॅनेजमेंटसंबंधीच्या या अभ्यासक्रमांमध्ये कायदा, फायनान्स, ह्युमन रिसॉर्स, ऑपरेशन्स मॅनेजमेंट, वैद्यकीय तसंच कायदाविषयक प्रश्न असे विषय शिकवले जातात. यामुळे संपूर्ण व्यवस्थापनाचं ज्ञान तुम्हाला मिळतं.

हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर हॉस्पिटल बिझनेस मॅनेजर, फूड अँड बिव्हरेज मॅनेजर, गेस्ट रिलेशन मॅनेजर, हॉस्पिटल अॅडमिनिस्ट्रेटर, फ्लोअर मॅनेजर, सेंटर मॅनेजर, पेशंट रिलेशन एक्सिक्युटिव्ह, फ्रंट ऑफिस अॅडमिनिस्ट्रेटर, ऑपरेशन एक्सिक्युटिव्ह म्हणून तुम्ही काम करू शकता. विविध शिक्षण संस्था आणि कॉलेजेसमध्ये हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

### दोस्त हे मस्त

## व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन



पक्षी मुळातच सुंदर असतात. त्यांची रंगीबेरंगी पिसं खूप आकर्षक वाटतात. वेगवेगळ्या आकाराच्या, प्रकारच्या या पिसांमुळे पक्षी स्टायलिश दिसतात. काही पक्ष्यांना केसही असतात. या केसांचीही विशिष्ट रचना असते. त्यामुळे पक्ष्यांनी हेअरस्टाईल केल्यासारखंच वाटतं. असाच एक पक्षी म्हणजे व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन. हे पक्षी म्हणजे कबुतरांची सर्वात मोठी प्रजाती आहे. ते मादी टर्कीच्या आकाराचे असतात. त्यांचे केस तुऱ्यासारखे वाटतात. जांभळट रंगाच्या या तुऱ्यांमुळे डोक्यावर मुकुट घातल्यासारखं वाटत असल्याने त्यांना व्हिक्टोरिया क्राउन्ड पिजन हे नाव पडलं.

### खादाडी

## यम्मी वॉटरमिलन स्मूदी



छोट्यांनो, कलिंगडं भरपूर प्रमाणात मिळतात. गारेगार कलिंगड खायला खूप छान वाटतं. या कलिंगडाची तुम्ही मस्त स्मूदी करू शकता. त्यासाठी तीन कप कलिंगडाच्या फोडी घ्या. बिया काढून टाका. अर्धा कप व्हॅनिला आईस्क्रीम, पुदीन्याची पानं हे साहित्य घ्या. मिक्सरच्या भांड्यात कलिंगडाचे तुकडे आणि व्हॅनिला आईस्क्रीम घाला. नीट फिरवून घ्या. हे मिश्रण ग्लासमध्ये ओता. पुदीन्याच्या पानांनी सजावट करा. गारेगार प्या. संध्याकाळी किंवा रात्री ही स्मूदी बनवून पिता येईल.

### धमाल

## मित्रमैत्रिणींसोबत घालवा वेळ




मुलांनो, सुट्टीमध्ये तुम्हाला दररोज काहीतरी वेगळं करायचं असतं. मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवायचा असतो. मग एखाद्या रविवारी तुम्ही मित्रमैत्रिणींना घरी बोलवू शकता. घरीच टीव्हीवर एखादा चित्रपट बघू शकता. थिएटरमध्ये जाऊनही चित्रपट बघण्याचा प्लॅन करता येईल. अशाप्रकारे प्रत्येक मित्रमैत्रिणीच्या घरी वेगळा कार्यक्रम ठरवा. काहीतरी क्रिएटिव्ह करा. तुमची सुट्टी मस्त आनंदात जाईल. लांब राहणाऱ्या मित्र किंवा मैत्रिणीला यावेळी पत्र लिहा. व्हॉट्स अॅप, फोनवर तुम्ही रोज भेटत असलात तरी पत्र लिहिण्याची गंमत वेगळीच असते. ती मजा अनुभवा.

### योगा टाईम

## पाठीसाठी शिशुआसन



मुलांनो, शाळेत जाताना तुम्ही पाठीवर दप्तर घेता. दप्तराच्या वजनामुळे पाठीच्या कण्याला त्रास होतो. पाठीला आराम मिळावा यासाठी तुम्ही शिशुआसन करा. शिशुआसन म्हणजे लहान बाळ रांगताना ज्या स्थितीत असतं तशी शारीरिक स्थिती. यामुळे मज्जासंस्थेचं कार्यही सुधारतं. हे आसन अगदी सोपं आहे.




## आग विझवणारा 'फायर वास'

व्हॉट्स न्यू?



आग लागल्यावर सगळ्यांची धावपळ होते. घरात लागलेली छोटीशी आगही मोठं नुकसान करू शकते. आग लागल्यावर आपण अग्निशमन दलाला फोन करतो. पण ते येईपर्यंत बराच वेळ जातो. पाण्याने आग विझवण्याचा प्रयत्न होतो. पण यात इजा होण्याची शक्यता असते. म्हणूनच सॅमसंगने अनोखा फ्लॉवरपॉट तयार केला. हा फ्लॉवरपॉट फेकल्यावर आग पटकन विझते. मित्रांनो, हा जादूचा फ्लॉवरपॉट नाही. यात आग विझवण्यासाठी वापरलं जाणारं पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण भरण्यात आलं आहे. आग लागलेल्या ठिकाणी हा फ्लॉवरपॉट फेकल्यानंतर तो तुटतो आणि त्यातून पोटॅशियम कार्बोनेटचं मिश्रण बाहेर पडल्याने आग विझते.

'फायर वास' असं नाव या फ्लॉवरपॉटला देण्यात आलं आहे. नेहमीच्या फ्लॉवरपॉटप्रमाणेच तो घरात ठेवायचा. शोभेची वस्तू म्हणूनही तो वापरला जातो. मुख्य म्हणजे वेळेला पटकन मिळतो. या फ्लॉवरपॉटमधलं पोटॅशियम कार्बोनेट आग विझवतं. शिवाय आगीशी ऑक्सिजनचा संपर्क होऊ देत नाही. यामुळे आग पसरत नाही. अनेक ठिकाणी अग्निशमन यंत्र लावलेली असतात. पण त्यांच्या तुलनेत हा फ्लॉवरपॉट वापरायला अगदी सोपा आहे. त्यामुळे आपण अगदी बिनधास्त आग विझवू शकतो.

## का हसायचं?

हेल्थ वेल्थ

छोट्यांनो, तुम्ही सकाळी सकाळी जवळच्या बागेतून जोरजोरात हसण्याचे आवाज ऐकले असतील. कोण बरं हसत असावं, असा प्रश्नही तुम्हाला पडत असेल. मित्रमैत्रिणींनो, अनेक ठिकाणी लाफ्टर क्लब्ज असतात. इथे फक्त हसायचं असतं. वेगवेगळ्या लयीत हसायला शिकवलं जातं. हसणं आपल्या आरोग्यासाठी चांगलं असतं. हसल्यामुळे आयुष्य वाढतं असं म्हणतात. हसण्याचे फायदे जाणून घेऊ या.

✻ हसणं म्हणजे एकप्रकारचा व्यायाम. जोरात हसताना आपल्या हृदयाची गती वाढते. रक्तदाबही वाढतो. धावल्यामुळे किंवा कोणताही व्यायाम केल्यामुळे शरीराला होणारे फायदे फक्त हसल्यामुळे मिळू शकतात.

✻ हसणारे लोक आजारी पडत नाहीत. हसताना आपल्या शरीरात एचजीएच नावाचा हार्मोन तयार होतो. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढते आणि शरीर जंतूंशी लढायला सज्ज होतं.

✻ हसण्याचं शास्त्र आणि त्याच्या आपल्या शरीरावर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाला 'जेलोटोलॉजी' असं म्हणतात.



✻ समोरची व्यक्ती हसत असेल तर आपल्यालाही हसू येतं.

✻ हसल्यामुळे स्मरणशक्ती सुधारते. एकाग्रता वाढते. त्यामुळे तुम्हा मुलांनी भरपूर हसायला हवं.

✻ स्वत:ला गुदगुल्या केल्यावर हसायला येत नाही. दुसऱ्याने अचानक गुदगुल्या केल्यावर मेंदूला धक्का बसतो. पण आपणच गुदगुल्या करणार असू तर याची मेंदूला कल्पना असते. गुदगुल्या करण्याआधीच त्याला आपल्या बोटांच्या स्पर्शाची जाणीव झालेली असते. त्यामुळे स्वत:च स्वत:ला गुदगुल्या करणं मेंदूसाठी धक्का ठरत नाही आणि आपल्याला हसू येत नाही.

## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) एंटॉमॉलॉजीमध्ये कशाचा अभ्यास केला जातो?
२) फिल्म अँड टिव्ही इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया कुठे आहे?
३) गोवा शिपयार्ड लिमिटेडची स्थापना कधी झाली?
४) संयुक्त राष्ट्रांचं मुख्यालय कुठे आहे?
५) फॅथॉमीटरनी काय मोजतात?
६) महाराष्ट्रात लोकसभेच्या किती जागा आहेत?
७) कोणत्या ऋतूत शरीराला जास्त फॅट्सची गरज असते?
८) इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ पेट्रोलियम कुठे आहे?
९) ट्रान्स सायबेरियन रेल्वे लाईन कुठे आहे?
१०)भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला कोणत्या वर्षी सुरुवात झाली?

उत्तरं : १) किटक २) पुणे ३) १९५७ ४) न्यूयॉर्क ५) समुद्राची खोली ६) ४८ ७) हिवाळा ८) देहरादून ९) रशिया १०) १९६२

## At a Glance

### संभलबाबत निर्णय घेण्यास मनाई

**नवी दिल्ली :** शाही जामा मशिदीच्या वादग्रस्त विहिरीबाबत उत्तर प्रदेश सरकार आणि संभल जिल्हा प्रशासनाला कोणतीही पावले उचलण्यास सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मनाई केली. अर्धी विहीर मशिदीच्या आत आणि अर्धी मशीद बाहेर आहे. या प्रकरणात जातीय सलोखा राखण्याची गरज असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. या भागात मशिदीच्या जागी हिंदू मंदिर असल्याचा दावा केला जात आहे.

### आरे कॉलनीत वृक्षतोडीला मनाई

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयानं शुक्रवारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाला मुंबईतील आरे वसाहतीत कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करण्याची परवानगी देऊ नये असे निर्देश दिले. न्यायमूर्ती अभय एस ओक आणि अरविंद कुमार यांच्या खंडपीठासमोर हा विषय आला. जर झाडं तोडायचीच असतील तर, वृक्ष प्राधिकरण संबंधित अर्जांवर प्रक्रिया करू शकते आणि त्यानंतर प्राधिकरण सर्वोच्च न्यायालयाकडून झाडं तोडण्यासाठी आदेश मागू शकते, असं खंडपीठानं म्हटलं आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) ने खंडपीठाला माहिती दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयानं हा आदेश दिला की, परिसरात अधिक झाडे तोडण्याचा कोणताही प्रलंबित प्रस्ताव नाही. खंडपीठानं या प्रकरणाची पुढील सुनावणी ५ मार्च २०२५ रोजी ठेवली आहे.

# रशिया-युक्रेन युद्धाचा शेवट?

## अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प रशियाचे अध्यक्ष पुतीन यांना भेटणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** युक्रेन युद्धाचा शेवट जवळ आला आहे का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यासह अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करू शकतात. अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यासाठी पुढाकार घेतल्याने, जगभरातील विश्लेषकांमध्ये त्याची चर्चा होत आहे. ट्रम्प यांनी व्लादिमीर पुतिन यांच्याशी भेटीची तयारी दर्शवली आहे.

फ्लोरिडा येथील मार-ए-लागो क्लबमध्ये रिपब्लिकन गव्हर्नरांशी झालेल्या बैठकीत ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितले की, पुतिन यांना त्यांची भेट घ्यायची आहे. ते म्हणाले, आम्ही या बैठकीची तयारी करत आहोत. मात्र, अध्यक्षपदाचा दुसरा कार्यकाळ सुरू झाल्यानंतर म्हणजे २० जानेवारीनंतरच ही बैठक शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. युक्रेनमधील युद्ध संपवायचे आहे, असा आग्रह ट्रम्प यांनी धरला आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात खळबळ उडाली आहे.

हे पाऊल रशियाच्या बाजूने असू शकते, असे काही विश्लेषकांचे मत आहे, तर काहीजण युद्ध संपवण्याच्या दिशेने टाकलेले सकारात्मक पाऊल म्हणून पाहतात. राष्ट्राध्यक्ष पुतिन यांनी रशियाच्या वतीने ट्रम्प यांच्याशी चर्चा करण्याची इच्छा यापूर्वीच व्यक्त केली आहे, असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. पण रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी सांगितले की, ट्रम्प यांच्या टीमकडून अद्याप कोणतीही औपचारिक विनंती करण्यात आलेली नाही. पदभार स्वीकारल्यानंतर चर्चेची राजकीय इच्छाशक्ती असेल तर राष्ट्राध्यक्ष पुतिन त्याचे स्वागत करतील, असे ते म्हणाले.



### पुतिन यांच्या कठोर अटी

● पुतिन यांनी शस्त्रसंधीसाठी कठोर अटी घातल्या आहेत, ज्यात युक्रेनला डोनेत्स्क, लुहान्स्क, खेरसन आणि झापोरिझझिया भागातून आपले सैन्य मागे घ्यावे लागेल, नाटोमध्ये सामील होण्याचे प्रयत्न थांबवावेत आणि आपल्या लष्करी दलांचा आकार मर्यादित ठेवावा लागेल. युक्रेनने या अटी सरसकट फेटाळून लावल्या आहेत. रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लावरोव्ह यांनी ट्रम्प यांचा तात्काळ शस्त्रसंधीचा प्रस्ताव फेटाळून लावला होता, मात्र मॉस्कोने वाटाघाटी करण्यास तयार असल्याचे म्हटले आहे.

### यापूर्वीही झाली भेट

● ट्रम्प आणि पुतिन यांची भेट होण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०१८ मध्ये फिनलंडची राजधानी हेलसिंकी येथे दोन्ही नेत्यांची शिखर परिषद झाली होती, जी त्यावेळी वादाच्या भोवऱ्यात सापडली होती. त्यानंतर ट्रम्प यांनी पुतिन यांचा मदतीचा प्रस्ताव अविश्वसनीय असल्याचे म्हटले होते. मात्र, आपल्या पहिल्या कार्यकाळात ट्रम्प यांनी रशियावर अनेक निर्बंध लादले आणि मुत्सद्दींची हकालपट्टीही केली. ट्रम्प आणि पुतिन यांच्यातील प्रस्तावित बैठक युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात खरोखरच यशस्वी होईल की ती केवळ राजकीय चाल ठरेल हे पाहावे लागेल.

# वायू प्रदुषणावर मुंबई उच्च न्यायालयाची टिप्पणी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** वायू प्रदूषणावर मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाची टिप्पणी केली आहे. शहरातील वायू प्रदूषणाच्या समस्येवर तोडगा निघेल की दरवर्षी दिवाळीनंतर नागरिकांना धुराच्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागेल, असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. बेकरींनी लाकूड आणि कोळशाच्या वापरावर बंदी घालावी, असेही हायकोर्टाने सुचवले. सीएनजी आणि इलेक्ट्रिक कारच्या वापरावर भर देण्यात यावा. मुख्य न्यायमूर्ती डी. के. उपाध्याय आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, मुंबईच्या ढासळत्या वायु गुणवत्ता निर्देशांकामागील समस्या आणि कारणांची सर्व प्राधिकरणांना व्यापक माहिती आहे, परंतु यावर उपाय योजना आणि करावयाच्या उपाययोजनांची त्वरित अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**प्रदूषण**

२०२३ मध्ये शहर आणि राज्यातील हवेच्या खराब गुणवत्तेची खंडपीठाने स्वत:हून दखल घेतली होती. दरवर्षी दिवाळीनंतर हीच परिस्थिती असते. अशा परिस्थितीत उपाय काय? दरवर्षी दिवाळीनंतर हे सगळं सुरू होतं. थोडक्यात सांगायचं झालं तर समस्या आणि कारणं आपल्याला माहीत आहेत, मग आता उपाय काय? हा धूर आपण दरवर्षी संपूर्ण मुंबईत पाहणार आहोत का? अशी विचारणा न्यायालयाने केली. काही दिवस दृश्यमानता खूप कमी असते. २०२३ मध्ये न्यायालयाने दिवाळीच्या सणाला दररोज काही तासफटाके फोडण्याची परवानगी दिली होती, परंतु या निर्देशाचे अजिबात पालन झाले नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे.

आमच्या आदेशानंतरही रात्री एक वाजेपर्यंत लोक फटाके फोडत असल्याचे आम्ही पाहिले. अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी आमच्या आदेशाचे अजिबात पालन केले नाही. अधिकाऱ्यांनी कोणतीही कृती केली नाही, हे पाहणे वेदनादायी असल्याचे हायकोर्टाने म्हटले आहे. न्यायालय आदेश देईल तेव्हाच काहीतरी केले जाते. याचा फटका सर्वांनाच बसत आहे. प्रशासनाने अधिक कठोर पावले उचलण्याची गरज आहे. प्रदूषणाची पातळी कधी कमी होणार? जोपर्यंत काही कठोर पावले उचलली जात नाहीत, तोपर्यंत परिस्थिती नियंत्रणात येणार नाही.

# पन्नू हत्येच्या कटाचा आरोप नाकारला

## राजकीय षड्यंत्र असल्याचा निखिल गुप्ताचा दावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नू यांच्या हत्येच्या कटात सहभागी असल्याचा आरोप अमेरिकेच्या न्याय विभागाने भारतीय नागरिक निखिल गुप्तावर ठेवला आहे. निखिल गुप्ताला २०२३ मध्ये चेकोस्लोव्हाकियामध्ये अटक करण्यात आली होती आणि प्रत्यार्पणानंतर तो अमेरिकेच्या तुरुंगात आहे. अमेरिकेचा आरोप आहे की, रॉचा अधिकारी विकास यादव याने निखिल गुप्तासोबत मिळून २०२३ च्या उन्हाळ्यात शीख फुटीरतावादी नेत्याच्या हत्येचा कट रचला होता. मात्र निखिल गुप्ता यांनी आपल्यावरील आरोप फेटाळून लावले आहेत. हे प्रकरण राजकीय षडयंत्राचा भाग असून आपली ओळख चुकीची असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



माध्यमांशी बोलताना निखिल गुप्ता यांनी आपल्यावरील आरोपांवर मोकळेपणाने भाष्य केले. निखिल हा भारतीय गुप्तचर संस्थेसाठी काम करत असून तो आदेशाचे पालन करण्यास नकार देऊ शकत नाही, असा युक्तिवाद त्याच्या वकिलांनी प्रागच्या सर्वोच्च न्यायालयात केला, तेव्हा न्यायालयाने हा दावा 'अवास्तव' असल्याचे सांगून फेटाळून लावले. भारतासारख्या लोकशाही देशात अशा पद्धतींचा वापर करता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. "मी आणि माझ्या वकिलांनी चेक कोर्टात केलेल्या युक्तिवादाचा आढावा घेतला तर लक्षात येईल की आम्ही असा कोणताही युक्तिवाद केलेला नाही. घटनात्मक न्यायालयाने आपल्या निर्णयात हे विधान समाविष्ट केले आहे, जे घटनात्मक न्यायालय आणि इतर प्राधिकरणांमधील संगनमत स्पष्टपणे दर्शवते हे ऐकून मला तितकेच आश्चर्य वाटले."

निखिलने सर्व पूर्णपणे खोटे आणि मनमानी आरोप असल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाशी संबंधित कोणालाही मी ओळखत नाही.

### राणीच्या बागेतील प्राण्यांची विशेष काळजी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राणीच्या बागेतील प्राण्यांच्या खाण्या-पिण्याची विशेष काळजी घेतली जात असून, एका बाजूला चीनमधील एचएमपीव्ही व्हायरसने संपूर्ण जगाला हादरवले असतानाच दुसरीकडे एव्हीएन फ्लू या व्हायरसने म्हणजेच बर्ड फ्ल्यूने प्राण्यांमध्येदेखील भीतीचे वातावरण निर्माण केलंय. या विषाणूमुळे नागपूरच्या गोरेवाडा प्राणिसंग्रहालयातील तीन वाघांचा मृत्यू झालाय. त्यामुळे केंद्र सरकारने पुढील काही दिवस प्राणिसंग्रहालय बंद ठेवण्याचा निर्णय घेतलाय. मात्र, पालिकेने राणीची बाग सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला असून, दक्षता मात्र घेतली जाणार असल्याचे प्रशासनाने जाहीर केलंय.

# जयंत पाटील यांच्या विरोधात पक्षांतर्गत नाराजी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीत शरदचंद्र पवार गटाला दारुण पराभवाला सामोरे जावे लागल्याने पक्षांतर्गत नाराजी आणि कुरबुरींना वेग आलाय. विधानसभा निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी आणि पक्षाची पुढील वाटचाल ठरवण्यासाठी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची आणि लोकप्रतिनिधींची दोन दिवसीय बैठक घेण्यात आलीय. मात्र या बैठकीत विद्यमान प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या विषयीची



नाराजी मोठ्या प्रमाणात बाहेर आली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना हटवण्याची मागणी थेट एका कार्यकर्त्याने भर बैठकीत केल्यानं खळबळ उडालीय. जयंत पाटील यांनीदेखील या आरोपांना उत्तर देताना आपल्या भाषणात कार्यकर्त्यांना फैलावर घेत तुम्ही बुथ लेव्हलला काय काम केलंय, दोन दिवसांत त्याचा अहवाल द्या, मी आठ दिवसांत राजीनामा देतो, असंही सांगितलंय.

जयंत पाटील यांच्या विषयीची नाराजी इतक्या मोठ्या प्रमाणात का उफाळून आली, याबाबतच्या उलटसुलट चर्चांना आता सुरुवात झालीय. खरं तर अजित पवारांनी वेगळा मार्ग स्वीकारल्यानंतर जयंत पाटील हे शरद पवार यांच्यासोबत कायम राहिलेत. विशेष म्हणजे जयंत पाटलांकडे प्रदेशाध्यक्षपद असले तरी ते कधीही भाजपामध्ये प्रवेश करतील, असा संशय नेहमीच त्यांच्याबाबत व्यक्त केला गेलाय. राष्ट्रवादीचा गट भाजपासोबत गेला आणि सत्तेत सहभागी झाला. तेव्हादेखील प्रवेशाची चर्चा होती.

### कर्मचारी महिलेऐवजी पती कामावर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जळगाव महापालिकेमध्ये नियुक्त ऑपरेटर कंत्राटी कर्मचारी महिलेऐवजी तिचा पती काम करत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. हा प्रकार समोर आल्यानंतर महापालिका यंत्रणेत खळबळ उडाल्याचं बघायला मिळतंय.

मिळालेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री कार्य-कौशल्य योजनेअंतर्गत सदरील महिलेची महापालिकेत जन्म मृत्यू नोंद विभागात कंत्राटी कर्मचारी म्हणून नियुक्ती झाली आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून महिलेऐवजी तिचा पती काम करत असल्याचं सांगितलं जातय. याप्रकरणी चौकशी सुरू करण्यात आली असून याबाबत जन्म मृत्यू नोंद विभागाच्या विभाग प्रमुखांकडून अहवाल मागवण्यात आलाय.

## आदरांजली...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**वॉशिंग्टन** अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि मेलानिया ट्रम्प यांनी अमेरिकेचे माजी अध्यक्ष जिमी कार्टर यांना आदरांजली वाहिली.

### अनिवासी भारतीयांची जगन्नाथ मंदिरला पसंती



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १८ व्या प्रवासी भारतीय दिन (पीबीडी) परिषदेत सहभागी झालेल्या भारतीय समुदायाच्या सदस्यांसाठी पुरीतील जगन्नाथ मंदिर एक प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे. पुरी, खुर्दा (भुवनेश्वर), कटक आणि जाजपूर या चार जिल्ह्यांतील २८ पर्यटनस्थळांवर अधिवेशनाच्या पहिल्या दोन दिवसांत (८ आणि ९ जानेवारी) ३,४०० अनिवासी भारतीयांनी हजेरी लावली आहे.

# उत्तर कोरियाला रशियाची मदत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** उत्तर कोरियाने या आठवड्यात मध्यम पल्ल्याच्या हायपरसोनिक बॅलेस्टिक क्षेपणास्त्राची चाचणी केली आहे. उत्तर कोरियाचा हुकूमशहा किम जोंग उन घाबरला आहे. उत्तर कोरियाने रशियाच्या अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाच्या मदतीने हे शक्य केले असून या मदतीच्या बदल्यात किम जोंग उन आता युक्रेनविरुद्धयुद्ध लढण्यासाठी एक लाखांहून अधिक सैनिक पाठवू शकतात, असे लष्करी विश्लेषकांचे मत आहे. उत्तर कोरियाने युक्रेनमध्ये जवळपास १० हजार सैनिक पाठवले आहेत, पण आता रशियाच्या मदतीने हुकूमशहा किम जोंग उन त्यात १० पटीने वाढ करू शकतात.

माध्यमातील वृत्तानुसार, उत्तर कोरियाच्या या निर्णयामुळे पूर्व आशियातील प्रादेशिक तणाव वाढण्याची भीती संरक्षण विश्लेषकांनी व्यक्त केली आहे. कारण किम जोंग उन केवळ तंत्रज्ञान आणि निधी मिळवण्याच्या शर्यतीत युक्रेनमध्ये अधिक सैन्य पाठवत नाहीत तर आपल्या लष्कराचे आधुनिकीकरण देखील करतात. यामुळे दक्षिण कोरिया, जपान आणि अमेरिकेला धोका निर्माण होऊ शकतो. उत्तर कोरिया आणि किम जोंग उन यांचा दक्षिण कोरियाबाबत चांगला हेतू नाही आणि अलीकडच्या काळात त्यांनी अनेक चिथावणीखोर कारवाया केल्या आहेत.

# घर वापसीला शंकराचार्यांचा पाठिंबा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** प्रयागराज महाकुंभ २०२५ मध्ये दाखल झालेल्या सुमेरु पीठाधीश्वर शंकराचार्य नरेंद्रानंद सरस्वती यांनी देशाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक रचनेवर मोठी चर्चा घडवून आणली. त्यांनी सनातन मंडळाचे समर्थन केले, पण त्याचवेळी 'घर वापसी' मोहिमेला चालना देण्यावर आणि देशाला सक्षम करण्यासाठी सनातन धर्माचा विस्तार करण्यावर भर दिला.

**महाकुंभ**

माध्यमांशी बोलताना शंकराचार्य नरेंद्रानंद सरस्वती यांनी सनातन धर्माचे महत्त्व आणि त्याचे रक्षण या मुद्द्यांवर आपले स्पष्ट मत व्यक्त केले. सनातन मंडळाची स्थापना करणे हे चांगले पाऊल असू शकते, परंतु देशात समान नागरी कायदा (यूसीसी) आणि लोकसंख्या नियंत्रण लागू करणे अधिक महत्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

राज्यनियंत्रित मठ आणि मंदिरांना राज्याच्या हस्तक्षेपापासून मुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच 'घर वापसी' मोहिमेला बळ देण्याची गरज ही त्यांनी व्यक्त केली. सनातन धर्मापासून काही कारणास्तव विभक्त झालेले लोक परत आले तरच देश मजबूत होईल, असेही ते म्हणाले.

# सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे सामान्यांसाठी खुले

**दिलासा**

**सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक पाऊल उचलत सर्वसामान्यांसाठी आपले दरवाजे खुले केले आहेत. देशातील या प्रतिष्ठेच्या न्यायालयाचा आतील भाग आता दर शनिवारी गाइडेड टूरच्या माध्यमातून लोकांना पाहता येणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे कामकाज आणि सांस्कृतिक वारशाची लोकांना जाणीव व्हावी हा या उपक्रमाचा उद्देश आहे.**

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार महेश टी. पाटणकर यांनी जारी केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, सक्षम अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार दुसरा आणि चौथा शनिवार वगळता सर्व कामकाजाच्या दिवशी (शनिवारी) मार्गदर्शक सहली आयोजित केल्या जातील. सकाळी १० ते ११.३०, ११.३० ते दुपारी १, दुपारी २ ते ३.३० आणि दुपारी ३.३० ते ५ अशा चार स्लॉटमध्ये हा पाहणी दौरा असेल.

या टूरमध्ये सहभागी होण्यासाठी आगाऊ ऑनलाइन



बुकिंग करणे बंधनकारक असणार आहे. प्रत्येक अभ्यागतासाठी ऑनलाइन बुकिंग करून या सहलीचे पूर्वनियोजन करण्यात येणार असून त्यांना न्यायालयाच्या आवारातील ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती देण्यात येणार आहे. गाईड टूरदरम्यान जनतेला सुप्रीम कोर्ट कोर्टरूम, नॅशनल ज्युडिशियल म्युझियम आणि आर्काइव्हमध्ये नेण्यात येणार आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या प्रशासकीय इमारतीत असलेल्या नवीन न्यायाधीश वाचनालयाला भेट देण्याची संधी मिळेल, जिथे सहसा प्रवेश प्रतिबंधित आहे.

### इतिहास आणि स्थापत्यशास्त्राचा परिचय

● सर्वोच्च न्यायालयाची इमारत १९५८ मध्ये बांधण्यात आली होती, त्याची पायाभरणी १९५४ मध्ये भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी केली होती. त्याची भव्य वास्तू आणि ऐतिहासिक महत्त्व यामुळे ते भारताच्या न्यायव्यवस्थेचे प्रतीक बनले आहे.

● सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक वारसा, न्यायालयीन प्रक्रिया आणि त्यातील संस्कृती जवळून पाहण्याची संधी या उपक्रमातून जनतेला मिळणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या वेबसाईटच्या गॅलरी सेक्शनमध्ये आतापर्यंत झालेल्या २९६ टूर्सची छायाचित्रे आणि माहिती देखील आहे.

### पहिला दौरा २०१८ मध्ये झाला होता.

● सर्वोच्च न्यायालयाचा पहिला मार्गदर्शक दौरा ३ नोव्हेंबर २०१८ रोजी झाला होता. तेव्हापासून आतापर्यंत अशा २९६ सहलींचे आयोजन करण्यात आले आहे. न्यायव्यवस्थेला जनतेच्या जवळ आणण्यासाठी याकडे महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे.



'गौतम एक गंभीर ढोंगी आहे. तो जे बोलतो ते करत नाही. कर्णधार (रोहित) कुठला आहे? मुंबईचा आहे. अभिषेक नायर कुठून आहे? मुंबईचा आहे. त्याला मुंबईचे खेळाडू पुढे ठेवण्याची संधी मिळाली आहे. जलज सक्सेनासाठी बोलणारे कोणी नाही. तो चांगली कामगिरी करतो. — मनोज तिवारी

" रोहितचे पण तसेच (विराटप्रमाणे) आहे. तो आपल्या फिटनेसवर काम करेल. जो व्यक्ती आज ऑस्ट्रेलियाविरूद्ध खराब खेळला. त्याच व्यक्तीने ट्वेंटी-२० वर्ल्ड कपमध्ये स्टार्कला ३ षटकार ठोकले. माझी रोहितला एकच विनंती आहे की त्याने फिटनेसवर काम केले पाहिजे. — नवजोत सिंग सिद्धू



# कॅप्टन्सीसाठी बुमराहच दावेदार!

## नेतृत्वाच्या जबाबदारीचे दडपण घेत नसल्याचे गावस्कर यांचे मत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सिडनी :** ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत जसप्रीत बुमराहने गोलंदाज आणि कर्णधार म्हणून केलेल्या कामगिरीने भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार सुनील गावस्कर फार प्रभावित झाले आहेत. रोहित शर्माच्या भवितव्याबाबत प्रश्न असल्याने भारताने आता पुढील कर्णधाराचा विचार करण्याची आवश्यकता असून यासाठी बुमराहच प्रमुख दावेदार असल्याचे गावस्कर यांना वाटते.

"भारतीय संघाचा पुढील कर्णधार म्हणून बुमराहचा सर्वप्रथम विचार केला जाईल असा माझा अंदाज आहे. तो या पदासाठी प्रमुख दावेदार असेल. पुढे येऊन निर्णय घेण्याची बुमराहमध्ये क्षमता आहे. त्याचे संघातील अन्य खेळाडूंशी चांगले जुळते. तो स्वत:सुद्धा उत्कृष्ट कामगिरी करत आहे. शिवाय नेतृत्वाचे तो फार दडपण घेतो असे जाणवत नाही. यशस्वी कर्णधाराला आवश्यक सर्व गुण बुमरामध्ये आहेत," असे गावस्कर म्हणाले.

प्रतिष्ठेच्या बॉर्डर-गावस्कर करंडकासाठी नुकत्याच झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेत भारताला हार पत्करावी लागली. मात्र, बुमराने ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांवर वर्चस्व गाजवताना पाच सामन्यांच्या नऊ डावांत सर्वाधिक ३२ गडी बाद केले. भारताने या मालिकेतील एकमेव सामना बुमराहच्या नेतृत्वाखालीच जिंकला होता. "काही कर्णधार असे असतात जे आपल्या संघातील खेळाडूंवर बरेच दडपण टाकतात. मात्र, बुमराहचे तसे नाही हे बाहेरून बघताना जाणवते. संघ व्यवस्थापनाकडून प्रत्येक खेळाडूला ठरावीक भूमिका दिलेली असती. त्या-त्या खेळाडूने दिलेली भूमिका चोख बजावावी अशी बुमरा अपेक्षा करतो. त्यामुळे खेळाडू अधिक मोकळेपणाने खेळतात," असे गावस्कर म्हणाले.

"गेल्या काही वर्षांपासून भारतीय गोलंदाजांचे बुमराहच नेतृत्व करत आहे. सामन्यादरम्यान तो गोलंदाजांच्या शेजारी म्हणजेच मिड-ऑफ किंवा मिड ऑनला उभा राहतो. तो त्यांना मार्गदर्शन करतो, महत्त्वपूर्ण सल्ले देतो. ऑस्ट्रेलियात त्याने केलेली कामगिरी अविश्वसनीयच होती. त्यामुळे लवकरच त्याची पूर्णवेळ कर्णधार म्हणून निवड झाल्यास मला जराही आश्चर्य वाटणार नाही."

### अतिरिक्त दडपण नको : कैफ

● बुमराला पूर्णवेळ कर्णधार म्हणून नियुक्त करण्यापूर्वी 'बीसीसीआय'ने बराच विचार करायला हवा, असे मत माजी कसोटीपटू मोहम्मद कैफने मांडले. 'बुमराहने केवळ बळी मिळवण्यावर आणि तंदुरुस्त राहण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. त्याच्यावर अतिरिक्त दडपण टाकता कामा नये. केवळ आतापुरता विचार करून बुमराहकडे नेतृत्व देण्यात आल्यास याचा त्याच्या कारकीर्दीवर विपरीत परिणाम होऊ शकेल," असे कैफ म्हणाला.



## आंतर आयटी महिला क्रिकेट स्पर्धेत सात संघ सहभागी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पाचव्या अंकुर जोगळेकर मेमोरियल आंतर आयटी महिला क्रिकेट स्पर्धेत सात नामांकित आयटी कंपन्यांच्या संघांनी आपला सहभाग नोंदवला आहे. हि स्पर्धा व्हेरॉक वेंगसरकर क्रिकेट अकादमी येथील मैदानावर ११, १२ व १८ जानेवारी २०२५ या कालावधीत रंगणार आहे. स्पर्धेत इन्फोसिस, स्प्रिंगर नेचर, कॅपजेमिनी, टेक महिंद्रा, डसॉल्ट सिस्टिम्स, कॉग्निझंट, डॉइश बँक या सात नामांकित आयटी कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवला आहे. ही स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेतील विजेत्या संघाला करंडक व २०००० रुपये, तर उपविजेत्या संघाला करंडक व १०००० अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. स्पर्धेचे उपांत्य, अंतिम फेरीचे सामने २५ जानेवारी २०२५ रोजी होणार आहेत. स्पर्धेचे उद्‌घाटन आयडियाज- अ- सास कंपनीच्या वित्तीय विभागाच्या प्रमुख मल्लिका जेम्स, कोलते पाटील डेव्हलपर्स चे सोमेश राठोड व अक्षय पवार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

## अव्वल मानांकित यानिक सिनर, इगा स्विअतेकवर सर्वांचे लक्ष



**नवी दिल्ली :** या वर्षातील पहिल्यावहिल्या ग्रँडस्लॅमला येत्या १२ जानेवारीपासून मेलबर्न येथे सुरुवात होणार आहे; मात्र त्याआधीपासूनच या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे वारे वाहू लागले आहेत. यामधील सहभागी होत असलेल्या टेनिसपटूंपेक्षा डोपिंगबद्दलची चर्चा अधिक प्रमाणात होऊ लागली आहे. यानिक सिनर व इगा स्विअतेक यांचे २०२४मधील डोपिंग प्रकरण अजूनही संपुष्टात आलेले नाही. यानिक सिनर याने मागील वर्षी ऑस्ट्रेलियन ओपन व अमेरिकन ओपन या दोन स्पर्धांचे जेतेपद पटकावत वर्चस्व प्रस्थापित केले; मात्र त्याच वर्षी तो उत्तेजक प्रकरणात अडकला. त्याची उत्तेजक चाचणी मार्च महिन्यात घेण्यात आली; मात्र याचा खुलासा ऑगस्ट महिन्यात करण्यात आला. त्याच्याकडून अनावधानाने ते झाले असल्यामुळे निलंबनाची शिक्षा त्याला देण्यात येणार नाही, असे आंतरराष्ट्रीय टेनिस इंटिग्रीटी एजंसीकडून स्पष्ट करण्यात आले. जागतिक उत्तेजकविरोधी संघटनेला मात्र हे मान्य नव्हते. किमान एक ते दोन वर्षांची शिक्षा सिनरला व्हायला हवी, असे त्यांना वाटत होते.

## शुभांगी सुतार ठरल्या पश्चिम महाराष्ट्रातील महिला शरीरसौष्ठवपटू



**सांगली :** शरीरसौष्ठव हे पुरुषी क्रीडा क्षेत्र. डौलदार; तसेच प्रमाणबद्ध शरीराचे सौष्ठव म्हणजे बळकट शरीराचे जाहीर प्रदर्शनच. आखीव-रेखीव स्नायू, सुडौलता, पिळदारपणा दाखवताना खेळाडूंचा कस लागतो. पुरेशी विश्रांती, पोषक आहार, वजन या गोष्टींचे तंतोतंत पालन करण्यासाठी शरीरसौष्ठवपटू वर्षानुवर्षे कसरत करत असतात. स्पर्धा म्हणून शरीराचे प्रदर्शन करण्यात पुरुषाला जशी सवय असते, तसे महिलांनी करणे खरे तर आव्हान. मात्र, विटा येथील शुभांगी सुतार या सांगली जिल्हा नव्हे, तर पश्चिम महाराष्ट्रात पहिल्या महिला शरीरसौष्ठवपटू ठरल्या आहेत. सर्वच क्षेत्रांत पुरुषांवर मात करून आघाडीवर असणारी नारीशक्तीही आज पुरुषांच्या क्षेत्रात संचार करत आहे. महिलांनी शरीर दाखवणे ही समाजमान्य नसणारी गोष्ट. मात्र शरीराचा प्रत्येक अवयव बांधेसूद असावा, अशी अपेक्षा शरीरसौष्ठव प्रकारात असते. कोल्हापूर जिल्ह्यातील अरळगुंडी (ता. गडहिंग्लज) येथील शुभांगी यांचा विवाह विट्यातील कैलास सुतार यांच्याशी झाला.

## महाराष्ट्राच्या दोन्ही संघाचा बाद फेरी गाठण्याचा मार्ग मोकळा

**नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या दोन्ही संघानी "५० व्या कुमार/कुमारी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत" साखळी सामन्यात सलग दोन विजय मिळवीत बाद फेरी गाठण्याच्या दिशेने पहिले पाऊल टाकले. अखिल भारतीय कबड्डी महासंघाच्या मान्यतेने उत्तर प्रदेश जिल्हा कबड्डी असो.च्या विद्यमाने रोशनबाग बंदिस्त क्रीडा संकुलात आजच्या सायंकाळच्या सत्रातील ग गटात महाराष्ट्राच्या मुलींनी चुरशीच्या लढतीत चंदीगडला ५१-४७ असे रोखत बाद फेरी गाठण्याचा आपला मार्ग मोकळा केला. पहिल्या डावापासून रंगतदार ठरलेल्या या सामन्यात विश्रांतीला २२-१८ अशी आघाडी महाराष्ट्राकडे होती. मध्यांतरानंतरच्या खेळात आहे ती आघाडी निसटू न देता महाराष्ट्राने आपला विजय निश्चित केला. वैभवी जाधव, वैष्णवी काळे यांच्या संयमी दमदार चढाया त्यांना साक्षी गायकवाडची मिळालेली बचावाची साथ याने हा विजय मिळविला. महाराष्ट्रा च्या मुलींची साखळीतील शेवटची लढत उत्तरांचल संघाशी होईल.

## परंदवाल स्पोर्टस, अचिव्हर्स क्रिकेट संघ उपांत्य फेरीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** लायन्स ज्युनियर लीग १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत परंदवाल स्पोर्टस क्लब, अचिव्हर्स क्रिकेट अकादमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत पहिल्या सामन्यात संस्कार फेरे(५-२०) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर परंदवाल स्पोर्टस क्लब संघाने एसएसए संघाचा ८ गडी राखून पराभव करत उपांत्य फेरी गाठली.

दुसऱ्या सामन्यात अर्जुन देशमुख(नाबाद १४६ धावा) याने केलेल्या शतकी खेळीसह सुदर्शन वाळके(५-३) याने केलेल्या सुरेख गोलंदाजीच्या जोरावर अचिव्हर्स क्रिकेट अकादमी संघाने क्रीक फायटर्स संघाचा २०३ धावांनी पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली.

सामनावीर - संस्कार फेरे व अर्जुन देशमुख.

## एन.जगदीशनचा अनोखा विक्रम

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** विजय हजारे ट्रॉफीच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात तामिळनाडूचा सलामीवीर एन. जगदीशनने आपल्या उत्कृष्ट फलंदाजीने सर्वांची मनं जिंकली. या खेळाडूने स्फोटक फलंदाजी करत विरोधी संघातच्या एका गोलंदाजाला चांगलाच घाम फोडला. त्याने राजस्थानच्या अमन शेखावतच्या एकाच षटकात सलग ६ चौकार मारत त्याला दिवसा चांदण्या दाखवल्या. जगदीशनने शेखावतच्या षटकात एकूण ७ चौकार मारत २९ धावा कुटल्या. ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

उजव्या हाताचा मध्यमगती गोलंदाज अमन शेखावत डावातील दुसरे षटक टाकायला आला होता. त्याचा पहिलाच चेंडू वाईड होता, जो यष्टीरक्षकाच्या मागून सीमारेषेच्या बाहेर गेला. यानंतर अमन शेखावतने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो अयशस्वी ठरला.

## उत्कर्ष क्रिडा मंच, अशोका फुटबॉल क्लब संघांची विजयी कामगिरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात डेक्कन इलेव्हन ड संघ, दिएगो ज्युनिअर्स, उत्कर्ष क्रिडा मंच आणि अशोका फुटबॉल क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून विजयी कामगिरी केली.

कात्रज येथील भारती विद्यापीठच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या सामन्यात बलराज जगताप याने केलेल्या एकमेव गोलाच्या जोरावर डेक्कन इलेव्हन ड संघाने एफसी बॅकडिनो संघाचा १-० असा पराभव केला. बलराज याने चौथ्या मिनिटाला केलेला गोल सामन्यातील एकमेव ठरला. दुसऱ्या सामन्यात दिएगो ज्युनिअर्सने युपीएसए संघाचा २-० असा पराभव केला. सामन्यामध्ये परम राठोड आणि जीवल गुंदेशा यांनी प्रत्येकी एकेक गोल केला.

चुरशीच्या सामन्यामध्ये उत्कर्ष क्रीडा मंचाने लिजंड्स फुटबॉल ॲकॅडमीचा ३-२ असा पराभव केला. अतितटीच्या झालेल्या सामन्यामध्ये हरीकृष्णा अदिकुंटला याने ९ व्या मिनिटाला गोल करून उत्कर्ष क्रीडा मंचाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. लिजंड्स फुटबॉल ॲकॅडमीच्या विन्सेंट नायर याने ३२ व्या मिनिटाला गोल करून संघाला १-१ अशी बरोबरी निर्माण करून दिली. त्यानंतर ३४ व्या मिनिटाला आदित्य सिंग याने गोल करून उत्कर्ष संघाची आघाडी २-१ अशी वाढवली. उत्तरार्धात देवांश मिश्रा याने गोल करून उत्कर्ष क्रीडा मंचाला ३-१ अशी बढत मिळवून दिली. लिजंड्स फुटबॉल ॲकॅडमीकडून विन्सेंट नायर याने जादाच्या वेळात गोल करून ३-२ अशी आघाडी कमी केली.

अशोका फुटबॉल क्लबने मॅथ्युज् एफसी संघाचा ३-० असा सहज पराभव केला. सामन्यामध्ये सुरज बी., विशाल जी. आणि हेमंत पी. यांनी प्रत्येकी एकेक गोल करून संघाचा विजय साकार केला.

## घटस्फोटाच्या चर्चेदरम्यान चहलने सोडले मौन, इन्स्टा स्टोरी होतेय व्हायरल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहल आणि त्याची पत्नी धनश्री वर्मा यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून सर्व काही ठीक नसून दोघं विभक्त होणार असल्याची चर्चा आहे. हे दोघेही लवकरच घटस्फोट घेणार असल्याचे बोलले जात आहे. ही बातमी समोर आल्यानंतर चहल आणि धनश्री गेल्या दोन दिवसांपासून सोशल मीडियावर पोस्ट करत आहेत. नुकतेच धनश्रीने या बातम्यांवर मौन सोडले आणि सोशल मीडियावर ट्रोलवर निशाणा साधला. यानंतर आता चहलने इन्स्टा स्टोरीच्या माध्यमातून या विषयावर प्रतिक्रिया दिली आहे.

भारताच्या नंबर वन लेग स्पिनरने इंस्टा स्टोरीमध्ये लिहिले, 'माझ्या सर्व चाहत्यांच्या अतूट प्रेम आणि पाठिंब्याबद्दल मी आभारी आहे, ज्यांच्याशिवाय मी इथपर्यंत पोहोचलो नसतो, पण हा प्रवास अजून संपलेला नाही! कारण माझ्या देशासाठी अजूनही अनेक अविश्वसनीय षटके टाकणे बाकी आहेत. मला एक खेळाडू असल्याचा अभिमान आहे, मी एक मुलगा, एक भाऊ आणि एक मित्र देखील आहे, मला अलीकडच्या घडामोडी, विशेषत: माझ्या वैयक्तिक आयुष्याबद्दलची उत्सुकता समजते. मी अशा प्रकरणांवर अनुमान लावणाऱ्या काही सोशल मीडिया पोस्ट्स पाहिल्या आहेत, ज्या खऱ्या पण असू शकतात किंवा नसू शकतात.' युजवेंद्र चहलने पुढे लिहले, 'एक मुलगा, एक भाऊ आणि एक मित्र या नात्याने मी सर्वांना नम्रपणे विनंती करतो की, या अटकळांमध्ये गुंतू नका. कारण त्याने मला आणि माझ्या कुटुंबाला खूप त्रास झाला आहे.

## सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग २०२४-२५ आजपासून

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग २०२४-२५ आजपासून सेंट व्हिन्सेंटच्या मैदानावर आयोजित करण्यात आली असून फुटबॉल स्पर्धेत १४ आणि हॉकीमध्ये ८ संघ जेतेपदासाठी झुंजतील. सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीगमधील सर्व सामने शनिवारी खेळले जातील. फुटबॉल लीग सहा आठवडे तर हॉकीचे चार आठवड्यांची असेल.

स्पर्धेच्या दीड महिन्याच्या कालावधीत खेळल्या जाणाऱ्या एकूण सामन्यांच्या प्रमाणात मुलांना मोठे व्यासपीठ मिळवून देणे आणि त्यांचा सर्वांगीण क्रीडा विकास करणे ही लीगमागील कल्पना आहे. या लीगमध्ये फुटबॉल लीगमध्ये कल्याणी स्कूल, हचिंग्स एचएस, दस्तूर बॉईज, सदर दस्तूर होर्मजदियार को-एड एचएस, सेंट पॅट्रिक्स एचएस, विद्या व्हॅली, लोयोला स्कूल, एरिन नगरवाला नॅशनल स्कूल, हिल ग्रीन स्कूल, एचडीएफसी स्कूल, फ्रा. ॲग्नेल स्कूल आणि यजमान व्हिन्सेंट एचएसचा समावेश आहे.

## ग्लोरी स्पोर्ट्‌स फाऊंडेशन संघाची विजयी सलामी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** स्व. अभिषेक ठाकूर यांच्या स्मरणार्थ आयोजित 'अभिषेक ठाकूर करंडक' आंतरक्लब खुल्या गटाच्या ट्रेन्टी-२० क्रिकेट २०२४-२५ स्पर्धेत ग्लोरी स्पोर्ट्‌स फाऊंडेशन संघाने आपल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. रायझिंग क्रिकेट क्लबने सलग दोन विजय मिळवून आगेकूच केली.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत सौरभ सिंग याने केलेल्या नाबाद पन्नास धावांच्या जोरावर ग्लोरी स्पोर्ट्‌स फाऊंडेशनने गेमचेंजर्स संघाचा ४ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा खेळणाऱ्या गेमचेंजर्स संघाने १७२ धावा धावफलकावर लावल्या. या डावामध्ये अभिनव तिवारी याने ६२ धावांची खेळी केली आणि संघाला मोठी धावसंख्या गाठून दिली. हे लक्ष्य ग्लोरी स्पोर्ट्‌स फाऊंडेशनने २० षटकात व ६ गडी गमावून पूर्ण केले. धावांचा पाठलाग करताना जईश पाटील याने ५१ धावांची खेळी केली. त्यानंतर सौरभ सिंग याने ३० चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह ५० धावा केल्या. सामन्यामध्ये ग्लोरी संघाला शेवटच्या षटकामध्ये ९ धावांची आवश्यकता होती. गेमचेंजर्सच्या निकीत धुमाळ याने टाकलेल्या या षटकामध्ये पहिला चेंडू वाईड पडल्याने अवांतर धाव मिळाली. त्यानंतर निकीत याने सौरभ याला चार चेंडू निर्धाव टाकले. पाचव्या चेंडूवर सौरभ याने षटकार मारून विजयासाठी एका चेंडूत दोन धावा असे समिकरण झाले. अखेरच्या चेंडूवरही सौरभ याने षटकार ठोकून ग्लोरी संघाला विजय मिळवून दिला.

सुदीप धरणगांवकर याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर रायझिंग क्रिकेट क्लबने ऑल स्टार संघाचा ११६ धावांनी सहज पराभव केला. रायझिंग क्रिकेट क्लबने पहिल्यांदा फलंदाजी करताना जयेश पोळ याच्या फलंदाजीच्या जोरावर १६४ धावांचे लक्ष्य उभे केले होते. दुसऱ्या डावामध्ये सुदीप धरणगांवकर याने १५ धावांमध्ये ३ गडी बाद करून रायझिंग संघाला सहज विजय मिळवला.

### १५ वी जिल्हा मानांकन बॅडमिंटन स्पर्धा

## कायरा, स्मित, ख्याती यांची आगेकूच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कायरा रैना, स्मित थोकल, ख्याती कत्रे यांनी हवेली तालुका संघटनेच्या वतीने आयोजित योनेक्स सनराईज पीवायसी एचटीबीए अमनोरा कप जिल्हा सुपर-५०० मानांकन बॅडमिंटन स्पर्धेत आपापल्या प्रतिस्पर्धीवर मात करून आगेकूच केली.

पीवायसी येथील बॅडमिंटन कोर्टवर ही स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत १५ वर्षांखालील मुलांच्या दुसऱ्या फेरीत स्मितने त्रिनवा भरवर २१-७, २२-२० अशी मात केली. यानंतर जतीन सराफने अश्विन मित्तलला २१-४, २१-८ असे नमविले. स्पर्धेतील १५ वर्षांखालील मुलींच्या दुसऱ्या फेरीत ख्याती कत्रेने शर्वरी घाडगेला २१-४, २१-५ असे, तर शिप्रा कदमने अद्विका पवारला १५-२१, २१-१०, २१-१६ असे नमविले. कायरा रैनाने स्वरा मोरेला १२-२१, २१-१७, २१-१२ असे पराभूत करून आगेकूच केली.





## शेवटच्या षटकात तब्बल ३० धावा, कर्णधार ठरला तारणहार; जिंकली थ्रिलिंग मॅच

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** गुरुवारी (९ जानेवारी) टी२० क्रिकेटमधील एक रोमांचक सामना पाहायला मिळाला. हा सामना बांगलादेश प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत रंगपूर रायडर्स विरुद्ध फॉर्च्युन बारिशाल संघात झाला. या सामन्यात शेवटच्या षटकात तब्बल ३० धावा निघाल्या, त्यामुळे रंगपूरने हा सामना शेवटच्या चेंडूवर जिंकला. या विजयाचा हिरो रंगपूरचा कर्णधार नुरुल हसन ठरला. त्याने अक्षरश: संघाचा विजय खेचून आणला.

झाले असे की रंगपूरसमोर विजयासाठी २० षटकात १९८ धावांची गरज होती. या धावांचा पाठलाग करताना १८ व्या षटकापर्यंत रंगपूरने १५७ धावात ४ विकेट्स गमावल्या होत्या. या षटकात नुरूल ६ व्या षटकात फलंदाजीला उतरला. मात्र, त्याच्यासमोरच १९ व्या षटकात सलग तीन चेंडूवर तीन विकेट्स गेल्या.

जहानदद खानने खुशदील शाहला ४८ धावांवर बाद केले. त्याच्या पुढेच्याच चेंडूवर मेहदी हसनला खेळात अडथळा आणल्याबद्दल बाद देण्यात आले. त्यापुढच्याच चेंडूवर मोहम्मद सैफुद्दीनला शून्यावर जहानददने बाद केले. त्यामुळे अखेरच्या षटकात रंगपूरसमोर ६ चेंडूत २६ धावा असे विजयासाठी समीकरण होते. शेवटचे षटक फॉर्च्युनकडून काईल मेयर्सने टाकले. पण, पहिल्या चेंडूपासूनच नुरुलने आक्रमक पवित्रा घेतला.